जीवन-चरित्रातही आढळून येतो. उदाहरणादाखल श्री साईसत्चरितातील काही अनुभव पुढे देत आहे.

रामदासीची पुस्तकांबद्दल असलेली आसक्ती दूर करण्यासाठी श्री साईबाबांनी रामदासीला औषधाचे निमित्त करून बाजारात पाठवून दिले व इकडे त्याचे विष्णुसहस्त्रनामाचे पुस्तक शामाला ईश्वर-नाम जपण्यासाठी दिले. ह्या अनुभवाद्वारे श्री साईबाबांचा अनासक्ती, ज्ञान व भक्ती असा तिहेरी हेतू साध्य झाल्याचे आपल्याला दिसून येते. श्री दासगणूंना ईशोपनिषदावर टीका (ईशावास्य- भावार्थबोधिनी) लिहीत असताना एकदा एक समस्या उद्भवली, त्यांतील सार-तत्त्वाचे आकलन काही केल्या त्यांना होईना. सरतेशेवटी ते श्री साईबाबांच्या दर्शनाला गेले, त्यांचे चरणी त्यांनी मस्तक ठेवले व उद्भवलेली समस्या त्यांना कथन केली. श्री साईबाबांनी मार्ग दाखविला, विलेपार्ल्याला काकासाहेब दीक्षितांकडे जा. त्यांच्या मोलकरणीकडून तुझ्या जटिल समस्येची उकल होईल. श्री साईबाबांच्या सांगण्याप्रमाणे श्री दासगणूंची शंका दूर झाली व त्यांना ज्ञान-प्राप्ती झाली. त्याचप्रमाणे श्री साईबाबा भक्तांना भक्तीची ओढ लावण्यासाठी धार्मिक ग्रंथ वाचावयास देत, प्रत्यक्ष त्यांच्याकडून वाचून घेत व स्वतःही त्या ग्रंथांचे तन्मयतेने श्रवण करीत असत. देह ठेवण्यापूर्वी काही क्षण अगोदर तर त्यांनी त्यांचा भक्त श्री. वझे यांच्याकडून 'रामविजय'' हा ग्रंथ वाचून घेतला.



सुदाम्याचे पोहे भरल्या अंत:करणाने खाताना भगवान श्रीकृष्णांनी जसा भेदभाव आणला नाही, त्याचप्रमाणे रानावनात हिंडून श्री साईबाबांचा शोध घेत टोपलीतून भाजी-भाकर आणणाऱ्या बायजाबाईंकडची ती भाजी-भाकर श्री साईबाबाही कोणताही किंतु मनी न बाळगता अवीट गोडीने खात असत.

भगवान श्रीकृष्णांनी मानवी-जीवनातील महान तत्त्व सांगितले. परंतु स्वत: न लिहिता आपला शिष्य वेदव्यास यांच्याद्वारे ते लिपिबद्ध केले, जे अजरामर झाले आहे. त्याचप्रमाणे श्री साईबाबांनी नानाविध अनुभवांद्वारे अमूल्य संदेश, श्रद्धा-सबुरीचा महामंत्र दिला. परंतु स्वत: न लिहिता आपला भक्त गोविंद रघुनाथ दाभोलकर यांच्याद्वारे शब्दांत रूपांतरित केला, जो पुढील कैक पिढ्यांसाठी श्री साईसत्‌चरिताच्या रूपाने मार्गदर्शनासाठी कायमचा ठेवा म्हणून विश्वविख्यात होत आहे.

वेगवेगळ्या विचारधारांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न जसा श्रीमद्‌भगवद्‌गीतेत दिसतो, त्याचप्रमाणे उरूस व रामनवमी हे उत्सव एकत्र साजरे करून भिन्न भिन्न धर्मांना एकत्र आणण्याचा प्रयत्न श्री साईबाबांनी केल्याचा श्री साईसत्‌चरितात आपल्याला दिसून येतो.

**- फकीर**

---

## जाहिराती

अनेक भक्तांची "श्री साईलीला"त जाहिरातरुपाने बाबांची सेवा करावी अशी इच्छा आहे. त्यानुसार विश्वस्त मंडळाने "श्री साईलीला"त जाहिराती प्रसिध्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या जाहिरातींचे दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| मलपृष्ठ | — | रु. १०,०००.०० |
| आतील मलपृष्ठ | — | रु. ७,५००.०० |
| आतील संपूर्ण पान | — | रु. ५,०००.०० |

सभासद, भक्त व हितचिंतक यांनी आपल्या जाहिराती आमच्या मुंबई कार्यालयाकडे पाठवून आम्हाला सहकार्य द्यावे.

**- कार्यकारी संपादक**

---

## रावबहादुर धुमाळ, बी.ए., एल्.एल्.बी., नाशिक

(१८ ऑक्टोबर, नाशिक २८ ऑक्टोबर, शिरडी)

मूळ लेखक–कै. बी. व्ही. नरसिंहस्वामी, मद्रास
मराठी अनुवाद–श्री. श. बा. पटवर्धन, मुंबई

तुम्हाला बाबांचे काय अनुभव आहेत असा तुमचा प्रश्न आहे. याचे उत्तर देणे अशक्य वाटते. कारण रात्रंदिवस, क्षणोक्षणी बाबांचे मला अनुभव येत आहेत. माझ्या जीवनात एकही असा प्रसंग वा घटना नाही की जिचा बाबांशी संबंध नाही. माझा असा दृढ विश्वास आहे की साईबाबाच माझ्या जीवनाची सूत्रे हलवितात. मग अमुक एक अनुभव आला हे तुम्हाला कसे सांगू? ही माझी धारणा जगाला पटेल की नाही याची मला पर्वा नाही. किंबहुना लोकांचा अविश्वास हेच स्वानुभव उघड न करण्याचे कारण ठरू शकेल. कारण प्रत्येक भक्ताला मनोमन असे वाटते की त्यांना आलेले अनुभव त्यांच्या वैयक्तिक, ऐहिक व पारमार्थिक प्रगतीसाठी असून अज्ञानी, नास्तिक व दांभिक लोकांनी भरलेल्या बहुजनसमाजापुढे प्रदर्शन करण्यासाठी नाहीत. तथापि श्रद्धावान चरित्रकारांना आपल्या ग्रंथात नमूद करण्यासाठी भक्तांच्या गूढ अनुभवांची माहिती हवी असते. पण ज्या भक्ताकडून ते अशा अनुभवांची मागणी करतात त्याला त्या अनुभवाचा प्राणच नष्ट झालासा वाटतो. एखादा वैद्यकशास्त्र शिकणारा एखाद्या जिवंत प्राण्याचे शरीरविच्छेदन करून जास्त माहितीसाठी सूक्ष्मदर्शकाखाली ठेवून त्याचे निरिक्षण करतो. ज्या क्षणी त्या प्राण्याचे शवविच्छेदन होते त्याच क्षणी तो प्राणी सजीव न राहता निर्जीव बनतो व अशा निर्जीव अवशेषांचेच निरिक्षण केले जाते. बाबा कोण आहेत हे समजण्यासाठी उत्तम मार्ग म्हणजे त्यांचे विषयी स्वत: अनुभव मिळविणे. पण बाबा गेले आहेत कोठे? ते अजून जिवंत असून देहधारी होते तेव्हापेक्षा अधिक कार्यक्षम आहेत. एखादा अत्यंत आर्त व श्रद्धावान भक्त आजही एका क्षणात त्यांचेशी संपर्क साधू शकतो. दुसऱ्यांचे अनुभव व तेही परक्या भाषेत इंग्रजीमध्ये व्यक्त करून प्रसिद्ध करण्यात त्या अनुभवांचे गांभीर्य नष्ट होते असे मला वाटते.

तुम्ही आता आलाच आहात तर माझे वैयक्तिक अनुभव मी तुम्हाला सांगतो.

सन १९०३ च्या सुमारास मी शेगावच्या गजानन महाराजांचा भक्त होतो. त्यांना मी नागपूरला श्रीमंत गोपाळराव बुटींकडे नेले होते. पुढे १९०७ च्या सुमारास मी बाबांच्या दर्शनास गेलो. प्रथम भेटीतच बाबांच्या असामान्य व्यक्तिमत्वाने मी भारावून गेलो. त्यांच्या प्रेरणेने मी गोपाळराव बुटींना शिरडीस घेऊन गेलो. आणि माझ्यासारखे तेही बाबांचे भक्त झाले. त्यांनी केलेली बाबांची सर्वात महत्त्वाची सेवा म्हणजे त्यांनी बांधलेला दगडी वाडाच पुढे बाबांचे समाधि मंदिर बनला. आता मी बाबांचे काही उद्गार व कृति यांविषयी थोडी माहिती देतो ज्यामुळे बाबा कोण आहेत व त्यांनी भक्तांसाठी काय केले व अद्यापही काय करीत आहेत यावर प्रकाश पडेल.

एकदा बाबा मला म्हणाले, "पावलो पावली मी तुझी काळजी घेत असतो. मी घेतली नाही तर तुझे काय होईल ते देवाला माहीत!" दुसऱ्या वेळी ते म्हणाले, "भाऊ, रात्रभर मला झोप नव्हती."

मी :— "बाबा, असे का?"

बाबा :— "रात्रभर मी तुझाच, केवळ तुझाच विचार करीत होतो." त्यांनी दिलेल्या कारणावरील अथांग प्रेम व वात्सल्याची ग्वाही ऐकून आश्चर्य, प्रेम व कृतज्ञता या भावांनी माझे अंत:करण भरून आले व डोळ्यांवाटे आनंदाश्रू वाहू लागले. या दीन लेकरावर किती माया? माझ्याकरिता किती कष्ट सोसले त्यांनी? माझी त्यांचेवरील निष्ठा दुबळी असून मी त्यांची खरी सेवा करण्यास असमर्थ होतो. तरी त्यांच्या दैवी शक्तीने जीवनात येणाऱ्या अडचणींचा मला परिचय होत असे. माझ्या भवितव्यात त्यांनी दूरवर पोचत असलेल्या नजरेने येणारी अनिष्ट घटना टाळून माझी वाटचाल सुखकर केली. माझ्या जीवनातले इष्ट त्यांच्यामुळेच शक्य झाले व होत आहे. त्यांनी मला केलेल्या सहाय्याचे काही प्रसंग इतके स्वयंसिद्ध आहेत की वर उल्लेख केलेल्या त्यांच्या उद्गाराबद्दल कोणाच्याही मनात संदेह राहू नये. या त्यांच्या माझ्यावर असलेल्या मायेमुळे मला धीर येऊन मी त्यांना पत्रे लिहीत असे. माधवराव देशपांडे त्यांना ती पत्रे वाचून दाखवीत व बाबांनी सांगितल्याप्रमाणे मला उत्तर पाठवित. बाबा देहधारी असतांना पुष्कळ वेळा व त्यांचे समाधि नंतर नेहमीच माझे प्रश्न मी प्रार्थनापूर्वक त्यांचे समोर मांडीत असे किंवा फोटोसमोर चिठ्ठ्या टाकीत असे. अशा वेळी बाबांचे आलेले उत्तर नि:सदिग्धपणे माझ्या हिताचे असे. सकृत्दर्शनी त्यांनी सांगितलेले उपाय व्यवहारीपणा, वैद्यकीय शास्त्रे किंवा सावधगिरीच्या निकषावर चुकीचे वाटले नाहीत. त्याप्रमाणे वागण्याचा माझा निश्चय नेहमीच शहाणपणाचा व हिताचा असल्याचे सिद्ध होते. नाशिकच्या या आमच्या वडिलोपार्जित वाड्यातच माझे आजपर्यंतचे आयुष्य

व्यतित झाले आहे. एकदा प्लेगच्या साथीत वाड्यात मेलेला उंदीर सापडला. यामुळे घर सोडावे की नाही या बाबतीत बाबांची अनुज्ञा घ्यावी असे ठरवून मी शिरडीस पत्र लिहिले. उत्तर येईपर्यंत घर न सोडण्याचे ठरविले. नाशिकलाच काय इतर कुठल्याही ठिकाणी काय व केंव्हा घडणार आहे हे त्यांना माहीत होते. आणि त्यांच्यावरील माझ्या दृढविश्वासामुळे ते कोणत्याही भोवऱ्यापासून माझे रक्षण करतील ही माझी पूर्ण खात्री होती. या एकोणतीस वर्षात माझे रक्षण झाले नाही किंवा माझी श्रद्धा अनाठाई होती असे वाटण्यासारखा एकही प्रसंग घडला नाही. बाबांचे उत्तर आल्यावर मी घर सोडून दुसऱ्या बंगल्यात राहायला गेलो. पण त्यांच रात्री माझ्या पुतण्याच्या पलंगाजवळ एक मृत उंदीर आढळला. मी पुन्हा बाबांना पत्र लिहून बंगला सोडावा का असे विचारले. ''बंगला सोडू नये'' असे उत्तर आले आणि आरोग्याचे विषय धाब्यावर बसवून मी तेथेच राहिलो. आम्हाला काही त्रास झाला नाही. नंतर काही दिवसांनी बंगल्यात आऊट हाऊसमध्ये आणि शेवटी ज्या विहिरीतून आम्ही वापरण्याकरिता पाणी घेत होतो त्या विहिरीतही मृत उंदीर आढळले. मी लगेच पुन्हा बाबांना पत्र लिहिले व जागा सोडण्याची परवानगी मागितली. आणि ती मिळणारच या अपेक्षेने सर्व सामानाची बांधाबांध करून मंडळींना बाजारातील आमचे घरी पाठविले. घराचे कुलूप उघडत असतानांच शिरडीचे पत्र मिळाले. त्यात ''आपण घर कशाला सोडावे? आपण तेथेच राहावे,'' असे स्पष्ट लिहिले होते. मी निमूटपणे सर्वांना घेऊन बंगल्यात रहावयास गेलो. पाणी मात्र गोदावरी नदीचे आणवीत होतो. त्यावेळी दररोज १४-१५ लोक तरी शहरात मृत्युमुखी पडत होते. अशा गंभीर परिस्थितीतसुद्धा आम्ही तेथेच राहिलो व आमच्या केसालाही धक्का लागला नाही. बाबांची माझेवरील कृपा माझ्या ऐहिक जीवनापुरतीच मर्यादित नव्हती. माझ्या पत्नीचे १९०९ साली निधन झाले. तिला सद्‌गती मिळावी या हेतूने मी उत्तरक्रिया, श्राद्धविधी वगैरे करीत होतो. सहाव्या मासिक श्राद्धाच्या वेळी बाबांनी तो विधी शिरडीस केल्यास ते तिला सद्‌गती देतील असे आश्वासन दिले. त्याप्रमाणे मी शिरडीस जाऊन तो विधी केला. बाबांनी १५ रूपये दक्षिणा मागितली. ती मी दिली. त्यांनी सांगितलेल्या प्रत्येक गोष्टींचा पडताळा येत गेल्याने ही सद्‌गतीची बाब जरी अदृश्य अशा परलोकींची असली तरी माझ्या पत्नीला निश्चितपणे सद्‌गती मिळाली अशी माझी खात्री आहे. त्यावेळी मी ३६ वर्षांचा उत्साही व सशक्त असा एक प्रथितयश वकील असल्याने माझे मित्र व हितचिंतक मला पुन्हा लग्न करण्याबद्दल आग्रह करू लागले. यात माझे श्वशुर नागपूरचे प्रसिद्ध वकील बापूसाहेब किनखेडे यांचाही सहभाग होता. या बाबतीत बाबांचे अनुमतीशिवाय मी काहीच करणार नाही असे त्यांना सांगितल्यावर ते मला शिरडीस घेऊन गेले. प्रथम ते एकटेच बाबांचे दर्शनास गेले. पाच मिनिटातच

परत येऊन ते मला म्हणाले, "बाबांचे नजरेवरूनच मी ओळखले की दुसऱ्या विवाहास त्यांची संमती नाही. तुम्हीही त्यांचे आज्ञेबाहेर काही करू नका." तसा मी त्यांचे आज्ञेबाहेर कधीच वागलो नाही. या घटकेपर्यंत मी दुसऱ्या लग्नाचा विचार मनात न आणता एकटा मजेत राहत आहे. माझ्या ऐहिक व आध्यात्मिक प्रगतिकरिता बाबांनी एक मार्ग ठरविला आहे व सुखी संसारी जीवन व्यतित केल्यानंतर त्याविषयी ते माझ्यात हळूहळू विरक्ती वाढवित आहेत. पुष्कळ वेळा त्यांचे मार्ग आपणास गूढ, अगम्य व बुचकळ्यात टाकणारे वाटत असले तरी त्यांचेच अवलंबन मी निश्चितपणे करीत असे. त्यांच्या कृपेने मला वकिली व्यवसायात यश मिळून माझी आर्थिक भरभराटही झाली. अशी अनेक उदाहरणे आहेत. यशरूपी व समृद्ध जीवन असले तरी ते मला अलिप्त ठेवतात. कारण त्यांनी इशारा केला की यातून मला निवृत्त व्हावयाचे आहे. त्यांच्या अनुमतीने मी काही सार्वजनिक कामेही केली. त्यांतील काही कामांत त्यांनी मला अशा विलक्षण रीतीने सांभाळले आहे की इतरांचा विश्वास बसणे कठीण आहे. म्हणून तो अनुभव सांगावा की नाही असे वाटते. पण तुम्हांस सत्य शोधायचे आहे म्हणून ती घटना मी तुम्हांला सांगतो.

माझ्या व्यवसायात बाबांचे मला कसे सहाय्य होत असे ते प्रथम सांगून सार्वजनिक कामात मला त्यांनी कसे सांभाळले ते सांगतो. सुमारे २०/२५ वर्षापूर्वी शिरडीत एक फौजदारी खटला उभा राहिला. सर्व खेड्यांत प्रचलित असलेल्या प्रथेप्रमाणे शिरडीतही आपआपसात वैरभाव असलेले वेगवेगळे गट होते. बाबांचा एक सेवेकरी रघु शिंदे व इतर पांच जणांवर एका मारवाडी महिलेचा विनयभंग केल्याचे पाहिलेल्या तथाकथित साक्षीदारांचे तक्रारीवरून खटला भरला गेला व सर्व आरोपींना सहा महिन्याची शिक्षा झाली. यात तात्याबा पाटील यांची सहानुभूती आरोपींकडे होती म्हणून आरोपींना वाचविण्याच्या उद्देशाने निकालपत्र घेऊन ते त्यावेळी शिरडीत हजर असलेल्या प्रसिद्ध वकील दादासाहेब खापर्डे, काकासाहेब दीक्षित आणि निवृत्त मॅजिस्ट्रेट रा. ब. साठे यांना भेटले. पण निकालपत्र मजबुत असल्याने अपिल करून काही फायदा होणार नाही असे तिघांनीही सांगितले. तात्याबांना मात्र आरोपींची निर्दोष मुक्तता व्हावी असे मनापासून वाटत असल्याने ते बाबांना विचारण्यास गेले. कागदपत्र घेऊन माझ्याकडे येण्यास बाबांनी त्यांना सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी येऊन मला कागदपत्रें दाखविली. ती वाचून मला त्यात आशेला काहीच जागा दिसेना. मग मी त्यांना सांगितले की तुम्ही या कामाकरिता मुंबईचा एखादा नामवंत बॅरिष्टर किंवा अहमदनगरहून प्रसिद्ध वकील आणा. पण बाबांनी मला तुमच्याकडे पाठविले आहे असे त्यांचे उत्तर ऐकून, यातील सर्व जबाबदारी बाबांवर आहे असे वाटून निकालपत्राचा अभ्यास करून मी अपिलाचा खर्डा तयार केला. तो घेऊन मी डि. मॅजिस्ट्रेटच्या

घरी गेलो. निकालपत्र किंवा अपिलाचा खर्डा हातात न घेता व न वाचता साहेबांनी मला कसला खटला आहे असे विचारले. मी खटल्याची थोडक्यात अशी माहिती सांगितली की बऱ्याच लोकांनी एका मारवाडी महिलेचा या सहा आरोपींनी विनयभंग केल्याचे प्रत्यक्ष पाहिले अशातऱ्हेच्या साक्षीवरून या खटल्यात आरोपींना शिक्षा झाली आहे. त्यावर ते म्हणाले, "यात तर पुरावा सबळ दिसतो, पण तुमचे काय मत आहे?" मी म्हणालो, "हा खटला व यातील साक्षीदार उभे राहण्याचे कारण म्हणजे गावात दुफळी आहे हेच आहे." यावर "तुम्हाला असे वाटते का?" असा त्यांनी प्रश्न केला. "मला असे नुसते वाटतच नाही तर खात्री आहे", असे मी ठाम उत्तर दिले. ते ऐकून त्यांनी लगेच तोंडी निकाल देऊन आरोपींची मुक्तता केली व निकालपत्रावर मी सांगितलेले मुद्दे नमूद केले. हे झाल्यावर त्यांनी मला विचारले, "तुमचे साईबाबा कसे आहेत? ते हिन्दु आहेत का मुसलमान? त्यांची तुम्हाला कसली शिकवण आहे?" त्यावर मी उत्तर दिले, "साईबाबा हिन्दु व मुसलमान नाहीत तर दोन्ही धर्मातील आहेत व त्यांची शिकवण काय आहे हे कळण्यासाठी त्यांनी स्वत: शिरडीला बाबांकडे जावे." "बरे, मी जमल्यास दर्शन घेईन", असे ते म्हणाले. आणि उन्हाळ्यात कोपरगांवपर्यंतसुद्धा ते गेले, पण असह्य उकाड्यामुळे तेथूनच मागे फिरले. कोणतेही कागदपत्र न वाचता त्यांनी दिलेला तोंडी निकाल, खालच्या कोर्टाचे रेकॉर्ड किंवा पोलिस प्रासिक्युटरचे सल्लामसलतीशिवाय केलेली आरोपींची सुटका व शेवटी विचारलेले बाबांविषयीचे प्रश्न, यावरून यामागे कुणाची शक्ती होती हे सांगणे नकोच. कारण त्याचा पडताळा लगेच आला. मी नागपूरहून शिरडीस परतलो. त्यावेळेस काकासाहेब दीक्षितांच्या मुलीच्या दहनक्रियेस खिन्न मनाने जाण्याच्या तयारीत बरीच भक्तमंडळी होती. त्यातील काहींना बाबा म्हणाले, "थांबा थोडा वेळ, जाऊ नका. मी तुम्हाला चमत्कार दाखविणार आहे." पण कोणताच चमत्कार न दिसल्याने सर्वजण दहनक्रियेस निघून गेले. तेवढ्यात मी तेथे पोहोचलो व सर्व आरोपी निर्दोष सुटल्याचे सांगितले. मग बाबा चमत्कार कोणता म्हणाले ते त्यांना कळले. दुसरे उदाहरण असे – फिर्यादीवर हल्ला करून त्यापैकी एकाचे हाड मोडण्याच्या आरोपावरून तिघा बंधूंना शिक्षा झाली होती. जखमी माणसावर एका स्थानिक दवाखान्यात उपचार झाले होते. पण ज्याने ते केले होते त्याला वैद्यकीय प्रमाणपत्र नव्हते. तो गावठी डॉक्टर होता. यात अपिलाचेच काम माझ्याकडे आले व मी अपिल मेमो आणि जामिन अर्ज तयार करून डि. जज्जाकडे गेलो. एक अनुभवी इंग्लीश अधिकारी डि. जज्ज होता. माझा अर्ज वाचून त्यांनी सांगितले, "मी जामीन मंजूर करणार नाही. कारण आरोपीविरूद्ध सबळ पुरावा आहे." यावर मी म्हणालो, "हाड मोडण्याचा पुरावा एका गावठी डॉक्टराकडून आला आहे व फिर्यादी पक्षातर्फे

हादर केला गेलेला पुरावा पक्षपाती व अविश्वासार्ह आहे. आरोपी हे शेतकरी असून तुरुंगात गेल्यास त्यांच्या कुटुंबाच्या शेतीचे नुकसान होईल. तथापि अपिलात शिक्षा कायम झाल्यास ते तुरुंगात जातीलच.'' यावर लगेच जज्जसाहेबांनी जामीन मंजूर केला. खटला सुनविण्यात आला तेव्हा सरकारी वकील मला म्हणाला, ''तुम्ही कायद्यानुसार केस लढवित असाल तर लढवा, पण दयेची याचना करण्याचा तुमचा बेत असेल तर त्याला मी विरोध करणार नाही.'' मी अंगी उसने अवसान आणून म्हणालो की आरोपी निर्दोष सुटण्यासाठी जिवापाड प्रयत्न करीत आहेत. त्याप्रमाणे माझे म्हणणे न्यायमूर्तींसमोर मांडून शेवटी दयेची याचना केली व शिक्षेत सूट मिळावी अशी विनंती केली. न्यायमूर्तींनी असा शेरा मारला की दयेची याचना करावयाची होती तर कायदेशीर मुद्दे मांडून कोर्टाचा वेळ निष्कारण घेतला. सरकारी वकील त्यांची बाजू मांडत असतांना कोर्टाने विचारले की फिर्यादी जबर जखमी झाला हे एका गावठी डॉक्टराच्या जबानीवरून कसे सिद्ध होते? सरकारी वकिलाने उत्तर दिले की फिर्यादी २० दिवस दवाखान्यात पडून होता. यावर कोर्टाने सरकारी वकिलाला धारेवर धरले. ''हा युक्तिवाद तुम्ही एखाद्या तिसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेट पुढे करा. तुम्ही एका सेशन्स जज्जासमोर केस लढवित आहात, हे लक्षात घ्या'', अशी जरब मिळाल्यावर सरकारी वकील पुरा बारगळला आणि आरोपी निर्दोष सुटले.

आता सार्वजनिक कामाबद्दल सांगावयाचे ते असे. मी जिल्हा लोकल बोर्डाचा पहिला बिन-सरकारी अध्यक्ष म्हणून नियुक्त झालो. हे पद मी १-११-१९१७ ते १३-५-१९२५ पर्यंत सांभाळले. मला रोज हजारो कागदपत्रांवर सह्या कराव्या लागत. याचा परिणाम माझ्या वकिलीवर होऊन माझे उत्पन्न पार बुडाले. या निःस्वार्थी कामाबद्दल सरकारने मला १९२७ साली रावबहादूर ही पदवी दिली. मी बाबांचेवर पूर्ण भरोसा टाकून यथाशक्ती हे काम करीत होतो. एक पट्टेवाला मी सही केलेले सर्व कागद काही वेळानंतर घेऊन जात असे. एके दिवशी माझा एक आदरणीय मित्र माझ्या घरी आला व आम्ही मध्यरात्रीपर्यंत गप्पा मारीत बसलो. यामुळे साहजिकच सह्या करण्याचे काम दुसरे दिवसावर ढकलावे लागले. पण दुसरे दिवशी मला परगावी जावयाचे असल्याने मी सर्व कागदपत्र तशीच परत पाठविली. त्याच रात्री मी परत आलो तेव्हा फक्त त्याच दिवसाचेच कागद माझ्या सहीसाठी आणल्याचे पाहिले. आदले दिवशीचे सर्व कागदपत्रावर माझी सही झालेली मी पाहिली. याला बाबांचे सामर्थ्य याशिवाय माझ्याकडे दुसरे उत्तर नाही. दुसरा अनुभव असा...

लोकल बोर्डाचा अध्यक्ष असल्याने प्राथमिक शाळा माझ्या अधिकारात होत्या. त्यावर्षी महिना अखेर झाल्यावर दिवाळी आली होती. त्यावेळी एज्युकेशन इन्स्पेक्टर

हा मुसलमान होता. तो माझ्याकडे आला व अशा मोठ्या सणासाठी शिक्षकांचा पगार वाटला जावा अशी त्याने विनंती केली. मी प्रथम त्याच्या विनंतीकडे दुर्लक्ष केले. २/३ दिवसांनी त्याने मला पुन्हा भेटून विनंती केली. तेव्हा मी चीफ ऑफिसरला असे करता येईल का, असे विचारले. त्यावर ते म्हणाले की चेक काढण्याबद्दल सरकारी अनुमोदन पत्र आले नसल्याने चेक काढू नये असे अकाऊन्टस् ऑफिसरने सांगितले आहे. त्यामुळे माझा नाईलाज झाला. त्या इन्स्पेक्टरने मला पुन्हा विनंती केली. त्यामुळे मी मनोमन तयार झालो. पण बाबांचे अनुमतीसाठी त्यांचे फोटोसमोर चिठ्ठ्या टाकल्या. त्यात पगार वाटपाबद्दल होकार मिळाला. मी लगेच चेक तयार करून तो अकौंट खात्याकडे पाठविला. तो वटला व सर्व शिक्षकांचे पैसे मिळाल्यामुळे ते पण आनंदीत झाले. याबद्दल मला बरेच दिवसांनी फक्त एक ताकीद मिळाली. मीही 'पुढे याची दखल घेतली जाईल' असा शेरा मारला व ते प्रकरण संपविले.

सन १९१० चे सुमारास माझे जिवलग मित्र श्रीमंत गोपाळराव बुटी यांनी मला मदत करण्याची इच्छा दर्शविली. बॅरिस्टरीच्या परीक्षेसाठी लागणारा माझा इंग्लंडचा खर्च व माझ्या गैरहजेरीत माझ्या कुटुंबियांचा खर्च हे दोन्ही भार उचलण्याचे त्यांनी मान्य केले. तेव्हा मी सर्व तयारी करून परवानगी मागण्याकरिता बाबांकडे गेलो. माधवरावांनी बाबांना विचारले, "भाऊला विलायतेस पाठवायचे का?" बाबा :– "कशाकरिता?" माधवराव :– "बॅरिस्टरच्या परीक्षेकरिता." बाबा :– "नाही. त्याची इलायत (नैसर्गिक प्रवृत्ती) आणि विलायत (परमेश्वरी इच्छा) हे दोन्ही बिलायतीत (इंग्लंडमध्ये) नसून येथेच आहे. त्याने इंग्लंडला का गेले पाहिजे?" यावर मी काय समजायचे ते समजलो.

सन १९१२ साली मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलमध्ये बेशुद्ध करून माझे ऑपरेशन करावयाचे ठरले. ऑपरेशन अवघड होते. पण क्लोरोफॉर्मचा माझेवर परिणाम होऊ लागताच शेजारीच एका खुर्चीवर बाबा बसलेले मला दिसले. माझ्या मनास लगेच धीर आला आणि माझे ऑपरेशन यशस्वी झाले, हे सांगणेच नको. नाशिकला माझी सरकारी वकिलाच्या जागेवर नेमणूक करावी का, अशी माझ्याकडे विचारणा झाली. मी दोन दिवसांची मुदत मागून बाबांना पत्र लिहिले. त्यांचे उत्तर आले, 'जे काय चालू आहे तेच राहू दे. नवीन काम घेऊ नये.' अर्थातच मी नकार दिला.

सन १९१८ साली बाबांनी देह ठेवण्याच्या अगोदर काही दिवस इन्फ्लुएंझाची साथ शिरडी, पुणे व बरेच ठिकाणी सुरु झाली होती. माझ्या पुण्यात रहात असलेल्या बंधूंची पत्नी या रोगाने गंभीर आजारी असल्याची तार आली. मी खर्चासाठी ८०

घेऊन निघालो. प्रथम बाबांचा आशीर्वाद व उदी घेण्यासाठी शिरडीस गेलो. बाबांनी सतत दक्षिणा मागून माझ्याकडील पैसे घेतले. त्यामुळे माझ्या पुण्यास जाण्याबद्दल मी साशंक झालो. "मी पुण्यास निघू का?" असे विचारल्यावर बाबा त्यांच्या पद्धतीप्रमाणे म्हणाले, "उद्या पाहू". दरम्यान पुण्याहून पेशंटच्या निधनाची तार आली. मग बाबांनी मला जाण्यास परवानगी दिली. माझ्या भावजयीचा मृत्यू अटळ होता व तिच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी मी पुण्यास जावे अशी त्यांची इच्छा होती, हे उघड आहे. यातले गूढ मला त्यावेळी कळले नाही पण यानंतर थोड्याच दिवसांत बाबांनी देह ठेवला आणि देह ठेवण्याअगोदर काही दिवस त्यांचे सहवासात राहण्याची शेवटची संधी मला मिळाली हेच माझे भाग्य.

सन १९३० ते १९३२ मी देवास संस्थानचा रेव्हिन्यू मेंबर म्हणून काम केले. त्यानंतर १९३३ अखेरपर्यंत मी सुरगाणा संस्थानचा कारभारी होतो. लोकल बोर्डाचे काम सोडल्यावर व वरील कामे संपल्यावर जेव्हा जेव्हा मी माझ्या वकिलीचा व्यवसाय करीत असे तेव्हा तेव्हा मला बाबांच्या कृपेने भरपूर द्रव्यप्राप्ती होत असे. बाबा माझी आर्थिक बाजू कशी सांभाळीत त्याचे एक उदाहरण देतो. सुरगाणा संस्थानच्या नोकरीत असतानांची गोष्ट आहे. मी एकदा जेवत असताना सुरगाणाचे राजेसाहेब त्या खोलीत आले. मी भोजन करीत आहे हे पाहून ते लगेच दुसऱ्या खोलीत गेले. तेथे टांगलेल्या बाबांच्या फोटोकडे थोडा वेळ पाहून पुन्हा माझ्या खोलीत आले व लगेच म्हणाले, "तुमचे वेतनात ५० रु. ची वाढ केली आहे." मी याबद्दल कधीच विचारले नव्हते. पण माझ्या साईमाऊलीच्या मनात देण्याचे आल्यावर मग उशीर होईल कसा?

प्रथम पूजेकरिता बाबांचा फोटो माझ्याकडे होता. काही वर्षानंतर बाबांची रंगीत प्रतिमा ठेवून मी पूजा करू लागलो. माझ्या जेव्हा देवास ते नाशिक फेऱ्या चालू होत्या तेव्हाही त्या प्रतिमा मी जवळ बाळगीत असे. देवासचा माझा आचारी व नाशिकचा माझा पुतण्या या दोघांचेही मनात त्या प्रतिमा मी देवास व नाशिक येथे ठेवाव्या असे होते. त्या निर्णयाकरिता चिठ्ठ्या टाकल्या असताना प्रतिमा जवळ बाळगाव्या असे नि:संदिग्ध उत्तर आले. यातली मधली तसबीर आहे ती राधाकृष्ण आईकडून जवळ जवळ बळजबरीने मागून आणलेली. त्यात बाबा विचारमग्न असे उभे दिसतात. ही तसबीर पाहिल्यावर मला बाबांनी काढलेल्या "भाऊ, मी रात्रभर झोपलो नाही, रात्रभर तुझा केवळ तुझाच विचार करीत होतो", या उद्गाराची आठवण होते. ही तसबीर आईकडून घेऊन मी मशिदीवरून वाड्यात जात असतांना बाबांनी मला हाक मारून बोलाविले. मी जाऊन प्रणाम केल्यावर तसबिरीकडे बोट दाखवून, "हे काय आहे?" असे त्यांनी मला विचारले. "त्यात तुम्ही आहात", असे मी

उत्तर दिले. ''ती मला दे'', असे ते त्यावर म्हणाले. मी तसबीर दिल्यावर त्यांनी ती हातात थोडा वेळ ठेवली व मग तिच्या मागे पुढे दृष्टी फिरवून पुन्हा माझ्या हातात देत ते म्हणाले, ''जवळ ठेव.'' बाबांनी आपल्या हाताने त्यांचा फोटो पूजेसाठी द्यावा अशी माझे अंतरीची तीव्र इच्छा अशा रीतीने पूर्ण झाली. हा बाबांचा प्रसाद मी आदराने जपून ठेवला आहे. बाबांनी मला इतर वस्तूही प्रसाद म्हणून जपून ठेवण्यास दिल्या आहेत. प्रथम भेटीतच २ रु. दक्षिणा माझेकडून मागून घेतली व लगेच परत देऊन म्हणाले 'जपून ठेव,' 'कोणाला देऊ नको,' 'खर्च करू नको.' यावरही पुन्हा २ रुपये, २० रुपये, १५ रुपये व ३० रुपये असे एकूणसत्तर रुपये त्यांनी मला दिले. ते सर्व मी जपून ठेवले आहेत. हे पैसे बाबांनी आपल्या विशिष्ट शैलीने मला दिले. एकदा मी व गोपाळराव बुटी बाबांजवळ असतांना गोपाळरावांकडे बाबांनी २० रुपये दक्षिणा मागितली. त्यांनी ती दिल्यावर तीच बाबांनी माझे हातावर ठेवली. नंतर एकावेळी त्यांनी थोडे थोडे असे ३० रुपये मला दिले. पुढच्या वेळी त्यांनी बापूसाहेब बुटींकडे ३० रुपये मागितले आणि ते मिळाल्यावर आपल्या दोन्ही हातात खुळखुळवून एकदम दोन्ही मुठी बंद केल्या व एका मुठीतले बुटींना व दुसऱ्या मुठीतले मला दिले. वाड्यात गेल्यावर आम्ही दोघांनी पाहिले तो प्रत्येकी १५ रुपये मिळाले होते. खरा भक्त 'ददाति, प्रतिगृण्हाति' या न्यायाने देतो आणि परत मिळवतो. दक्षिणा घेण्यातले मर्म त्या त्या प्रसंगानुरुप किंवा बाबांच्या त्यावेळच्या उद्‌गारावरून काही वेळा ध्यानी येत असे. 'यस्यानुग्रहमिच्छामि तस्य सर्वं हराम्याहम्।' या न्यायाने बाबा पुष्कळ वेळा भक्तांकडे असलेले सर्व पैसे दक्षिणारुपाने मागून घेत असत. अशी निर्धन स्थिती माझी बऱ्याच वेळा झाली होती. पण त्याचे मला कधी वाईट वाटले नाही. कारण तेच देतात व तेच घेतात. द्रव्य पुरवठा करण्याची जबाबदारी त्यांची आहे ही माझी धारणा असल्याने मला पैशाची अडचण त्यांनी कधीच भासू दिली नाही. सन १९१८ साली माझ्या शिरडीच्या मुक्कामात त्यांनी माझ्याजवळचे सर्व पैसे दक्षिणारुपाने मागून घेतले आणि सर्व पैसे संपल्यावर मला म्हणाले, ''भाऊ, मला ७ रुपये दे.'' ''माझेजवळ काहीच नाही,'' मी म्हणालो. यावर ते म्हणाले, ''कोणाकडून तरी मागून आणून दे.'' मी कोणीतरी उच्चपदस्थ आहे म्हणून कोणाकडे मागू कसा हा वृथाभिमान होऊ नये हे शिकविण्याचा हा धडा त्यांनी दिला होता. ह्या शिकवणीमुळे बाबांचे महासमाधिनंतरही मी शिरडीला जाऊन बाबा जिथे जिथे भिक्षा मागत असत तिथे तिथे जाऊन भिक्षा मागितली. यात मला थोडाही कमीपणा वाटला नाही. दुसऱ्या एका प्रसंगी माझ्याकडे असलेले सर्व पैसे बाबांनी मागून संपवले व पुन्हा वर ५० रुपये मागितले. मग त्यांनी अशा माणसाकडे पाठविले की ज्याने मला पैसे देण्यास नकार दिला. मग त्यांनी मला रा. बा. साठेसाहेबांकडे पाठविले.

बांनी मला आनंदाने पैसे दिले. त्यावेळी साठेसाहेबांकडे का पाठविले या मागचे हस्य मला कळले नव्हते. पण नंतर असे कळले की, साठेसाहेबांचे पेन्शन निश्चित किती द्यावयाचे हे ठरले नव्हते. त्यांची मागणी ५० रु. नी जास्त होती. मला त्यांचेकडे ५० रुपये मागण्यास पाठविले याचा अर्थ त्यांची ५० रुपये अधिक मिळणेची मागणी सरकारने मंजूर केली असा होता. म्हणूनच साठेसाहेबांनी आनंदाने ५० रुपये मला दिले. विनयभंगाच्या आरोपातून सुटलेल्या आरोपींनी मला मी न मागता ३०० रुपये श्री दिली. मी नगरहून शिरडीस आलो. तेथील ३ दिवसांच्या मुक्कामात बाबांनी एकंदर ३०० रुपये दक्षिणा रूपाने मागून घेतले. हे योग्यच झाले. कारण बाबांच्या सेवेकऱ्याला बाबांनीच आपल्या सामर्थ्याने सोडवून आणले होते. मी निमित्तमात्र होतो.

एकदा ईश्वरासंबंधी बोलणी चालू असतांना ते म्हणाले, ''देव, देव काय म्हणतोस, देव माझ्या खिशात आहे.'' या त्यांच्या बोलण्यावरून त्यांचा अधिकार किती मोठा होता हे लक्षात येईल. एकदा ते प्रसादाची हंडी तयार करीत होते. ती अंगणात शिजत असतांना तेथे एक फकीर आला. त्याला मांस भोजन आवडत असल्याने त्या हंडीत त्याने मांसाचा तुकडा घातला. ते पाहून बाळासाहेब मिरीकरांनी बाबांना विचारले, ''आपल्या जिभेचे चोचले पुरविण्यासाठी प्राणीहत्या का करावी ?'' त्यावर बाबांनी एवढेच उत्तर दिले, ''जो करील तोच मारील व जो मारील तोच करील.'' याचा अर्थ मी असा घेतला, सत्पुरुषांचे सान्निध्यात एखादा पशू जरी मारला गेला तरी त्याला सद्गती मिळते. आता काकासाहेब दीक्षितांनी मला सांगितलेले एक अनुभव मी तुमच्यापुढे मांडतो. त्यावेळी काकासाहेब मोठ्या अडचणीत सापडले होते. त्यांना पुढील चार दिवसांत एकंदर ३०,००० रुपयांची परतफेड करावयाची होती. पण एवढ्या मोठ्या रकमेची तरतूद कशी करावी या घोर चिंतेत ते होते. तेव्हा त्यांना एक स्वप्न पडले. त्यात त्यांचा सावकार पैसे परत फेडण्याबद्दल तगादा करीत होता. त्याला काकासाहेबांनी उत्तर दिले, तुम्ही काळजी करू नका. सर चिमणलाल व इतर दोन तीन श्रीमंत मंडळींची नावे घेऊन त्यांनी सावकाराला सांगितले की या लोकांचे मदतीने मी तुमचे पैसे परत करीन. नंतर लगेच ते जागे झाले व त्यांना संपूर्ण स्वप्न आठवले. त्यात त्यांनी सावकाराला क्षुद्र मानवी आधारावर विसंबून आश्वासन दिल्याचे पाहून त्यांनाच लाज वाटली. कारण ऐन वेळी दगा देणारे मानवच असतात. त्यांचा खरा आधार होता श्री साई. त्यांचे नाव न घेता वरील नावे कशी घेतली याची त्यांना फार खंत वाटली. म्हणून बाबांचे फोटोसमोर जाऊन अश्रू भरलेल्या नयनांनी त्यांनी क्षमा करण्याबद्दल बाबांची प्रार्थना केली. असे केल्यानंतर फक्त बाबाच आपल्याला या पेचातून सोडवतील असा त्यांना धीर वाटू लागला. कोणत्याही कठीण प्रसंगी बाबाच आपली सोडवणूक करतात याचा अनुभवही त्यांना होता. पण जसजसा

पैसे देण्याचा दिवस जवळ येऊ लागला तसतसा पैसा उपलब्ध होण्याचा मार्ग कांही दिसेना. त्या तारखेच्या आदल्या दिवशी याच [illegible]ीचा विचार करीत ते ऑफिसात बसले होते. तेव्हा त्यांच्या एका मरहूम [illegible] मित्राचा मुलगा त्यांचेकडे आला आणि 'अमुक अमुक ठिकाणी वीस हजार रुपये गुंतवू कां?' असे विचारू लागला. तेव्हां काकासाहेबांनी त्या गुंतवणुकीमुळे उद्‌भवणाऱ्या अडचणी त्याला सांगितल्या व म्हणाले, ''पण तू ही रक्कम माझ्याकडे ठेव म्हणून ठेवावयास तयार असल्यास तुझ्या तीर्थरूपांच्या व माझ्या मैत्रीचा मी कधीच गैरफायदा घेणार नाहीं.'' हे ऐकल्यावर तो मुलगा म्हणाला की केवळ ह्याच कारणामुळे मी ही रक्कम तुमचेकडे ठेव म्हणून ठेवण्यास तयार आहे. बिकट प्रसंगी वडिलांच्या मित्रास सहाय्य केले नाहीं तर माझ्या वडिलांना दुःख दिल्यासारखे होईल, असे म्हणून त्याने आग्रहाने ती रक्कम दिक्षितांना दिली व अखेर काकासाहेब मानाने ऋणमुक्त झाले. भक्ताची लाज राखण्यासाठी साईमाऊली अशी धावली.

काकासाहेबांचा धाकटा भाऊ सदाशिव बी.ए., एल्.एल्.बी. वकील होता. पण त्या व्यवसायात त्याला नागपूर, मुंबई व खाण्डवा येथे यश मिळाले नाहीं. म्हणून काकासाहेबांनी बाबांच्या फोटोपुढें चिठ्ठ्या टाकल्या व बाबांच्या अनुमतीने त्याला आपल्या मुंबईच्या ऑफिसात कामास ठेवून घेतले. पण सदाशिवला तेही जमेना व तो मुंबई सोडून जातो असे म्हणू लागला. बाबांची कबुली मिळूनही असे का व्हावे याचे काकांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, ''आता दिवाळी करूनच खाण्डव्यास जा.'' याच वेळात एक आश्चर्य घडले. काकासाहेबांचा एक मित्र येऊन मला म्हणाला की कच्छ संस्थानच्या बँकेसाठी एक विश्वासू माणूस – ज्याला गुजराथी भाषा येते – असा पाहिजे आहे. काकांनी आपल्या भावासाठी त्याला विचारले. तो म्हणाला, ''ते मोकळे आहेत हे मला माहीत नव्हते. ते येत असतील तर सोन्याहून पिवळे.'' असे म्हणून त्याने आपल्या शिफारसीसह त्याला एक तिकीट पाठविले. तेथे सदाशिवची दरमहा एक हजार पगारावर नेमणूक होऊन बरीच वर्षे त्या जागेवर तो होता. त्यामुळे बाबांच्या सूचनेचा ताबडतोब जरी परिणाम दिसला नाही तरी भक्ताचे अंतिम हित कसें साधले जाई याचे हे उदाहरण आहे.

(क्रमशः)

# श्री साईंचे सत्य चरित्र - अध्याय ७ वा

## उत्तरार्ध

**सटीक गद्य अनुवाद :**
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त),
बंड गार्डन रोड, पुणे.

**(मागील अंकावरून पुढे चालू)**

अजिन (बसण्यासाठी हरणाचे कातडे) व दंड (संन्याशाच्या हातातील काठी) ारण करणारे, तपश्चर्या करणारे (तापसी), हरिद्वार इत्यादी तीर्थांच्या ठिकाणी राहणारे तीर्थवासी), भिक्षा मागून पोट भरणारे गोसावी (तडीतापडी), ऐहिक सर्वस्वाचा त्याग केलेले चतुर्थाश्रमी (संन्यासी), संसार बंधने टाकून दिलेले (त्यागी), उदासी गोसाव्याचा एक पंथ), असे सर्व पुष्कळ बाबांकडे येत असत. (बाबा) खूप (उदंड) ोलत चालत व हसत असत. त्यांच्या जीभेवर (जिव्हेस) सदासर्वदा (अखंड) 'अल्ला ालिक' (परमेश्वर सर्वाधिपती आहे) असे शब्द असत. त्यांना वाद वितंड आवडत से व त्यांचेजवळ नेहमी सटका (दंड) असे. (हा दंड म्हणजे हात दीडहात किंवा -२ १/४ फूट लांब आणि चांगला पायाच्या आंगठ्याएवढा जाड असा मजबूत ाळ्या लाकडाचा सटका जो बाबांपाशी नित्य असे.) त्यांना तपश्चर्या करण्याची ावड (तापसी वृत्ती) होती. ते शमी (ज्यांचे मनोविकार शांत झालेले आहेत असे) दान्त (ज्यांनी आपल्या ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिय यांचेवर ताबा मिळविला आहे असे) ते. आणि त्यांची वाणी पूर्ण वेदान्त (ब्रह्मज्ञान) सांगत असे. अखेरपर्यंत बाबांचा र्ण पत्ता (अंत) कोणाला लागला नाही. राव (श्रीमंत) असो किंवा रंक (दरिद्री) असो; सगळ्यांना सर्व बाबतीत (निष्टंक) सारखी वागणूक होती. लक्ष्मीपुत्र असो ा भिकारी असो दोघांनाही तेथें सारखे माप (योग्यता मोजण्याचे साधन) होते. कोणाचे बेवाईट कर्म, तसेच मनातील मर्म (रहस्य) त्यांना ठाऊक असे व त्याची खूण व तात्पर्य (मर्म) सांगून ते भक्तांना खूप आश्चर्यचकित करत असत. ज्ञानाचे ते भांडार (जाणतेपणाची सांठवण) होते, परंतु अज्ञानाचे (नेणतेपणाचे) ते सोंग (पांघरूण) करीत. मानपान मिळविण्यासाठी खटपट करणे म्हणजे त्यांना मोठे कष्ट (शीण) वाटे. अशा प्रकारची साईबाबांची लक्षणे होती. (स्वभावाचे ज्ञापक गुणावगुण होते) शरीर (काया) री मानवाचे होते तरी त्यांची करणी अपूर्व व देवाची होती. शिरडीतला प्रत्यक्ष देव तो हाच अशी तेथील सर्व लोकांची भावना होती. (ओ. २९-३५)

काय बाबांचे चमत्कार! मी पामर (क्षुद्र माणूस) ते किती म्हणून वर्णन करू ?

देवादेवळांचे जीर्णोद्धार बाबांनी अपार करविले. शिरडी येथे तात्या पाटलांच्या हातून शनी, गणपती, शंकरपार्वती, मारुती आणि ग्रामदेवता यांची सुस्थिती लावून दिली. लोकांपासून दक्षिणेच्या निमित्ताने बाबा जो पैसा घेत त्यातील काही ते धर्मार्थ (धर्मकार्यासाठी) वाटीत तर काही तो तसाच देऊन टाकीत असत. कोणाला रोज तीस रुपये, कोणाला दहा, पंधरा किंवा पन्नास (देखील) मनाला वाटेल त्याप्रमाणे मोठ्या खुशीने वाटीत असत. हा तर सर्व धर्माचा (दानधर्माचा) पैसा. तो घेणाऱ्याचाही तसाच पूर्ण विश्वास होता. बाबांची देखील त्या पैशाचा विनियोग (उपयोग) चांगल्या कामासाठी व्हावा अशीच इच्छा (मनीषा) होती. (ओ. ३६-४०)

बाबांच्या दर्शनाने कित्येक लोक पुष्ट (निरोगी धट्टेकट्टे) झाले, कित्येक दुष्टाचे सुष्ट (दूराचारीचे सदाचारी) झाले, कित्येकांचा कुष्ट (कोड, महारोग) गेला आणि कित्येक अभीष्ट (कल्याण) पावले. कित्येक अंजन (डोळ्यात घालण्याचे काजळ किंवा औषध) किंवा पाला रस (झाडांच्या पानांचा रस) घातल्याशिवाय आंधळ्याचे डोळस (दृष्टी साबूत असलेले) झाले. तर कित्येक पंगूंना (लंगड्यांना) बाबांचे पाय धरताच चालता येऊ लागले (पाय आले). बाबांचा महिमा अनिवार (पुष्कळ मोठा, आवरण्यास कठीण) होता. त्याचा पार (अंत) कोणासच लागत नव्हता. त्यांचे दर्शनासाठी अपरंपार (अतोनात) व चौबाजूंनी यात्रा येऊ लागली. (ओ. ४१-४४)

धुनीजवळ (निकट) त्याच जागी मलमूत्राते विसर्जूनी (संडास लघवी करून) कधी पारोसे (स्नान केल्याशिवाय) किंवा, कधी स्नान करून बाबा सदा ध्यानात गढलेले (निरत) असत. डोक्याला छानसे पांढरे पागोटे, कमरेला स्वच्छ धोतर व अंगात सदरा (कुडते किंवा पैरण) असा आरंभी त्यांचा पेहेराव (पोषाख) असे. (ओ. ४५-४६) (पहा टीका अ. ५, ओ. ६६)

सुरुवातीला (साईबाबा) गावात वैद्यकी करीत. पाहून पाहून दवा (औषध) देत. त्यांच्या हाताला बरेच यश होते. म्हणून (त्या भागात) ते प्रख्यात हकीम (वैद्य) म्हणून नावाजले. एकदा एका भक्ताचे डोळे सुजून लाल झाले व बुबुळ रक्तबंबाळ झाले. शिरडीत वैद्य (डॉक्टर) मिळेना. भक्त बिचारे भावार्थी (श्रद्धाळू). त्यांनी (त्या भक्ताचे डोळे) बाबांना दाखविले. लगेच बाबांनी बिब्बे (भिलावा) ठेचून तयार करविले. (अशा डोळ्याच्या दुखण्याला) कोणी काड्यांनी सुरमा लावतील, कोणी गाईच्या दुधाच्या घड्या ठेवतील, कोणी थंडगार (शीतळ) कापूराच्या वड्या ठेवतील तर कोणी अंजनाच्या (काजळाच्या) पुड्या देतील. परंतु बाबांचा तर उपायच वेगळा होता. त्यांनी स्वत: आपल्या हाताने (बिब्ब्याचा) एकेक गोळा उचलला, आणि एकेक डोळ्यात दाबून (चिणूनि) भरला आणि वाटोळा (गोल) फडका गुंडाळला

दुसऱ्या दिवशी डोळ्याची पट्टी सोडली, वर पाण्याची धार धरली आणि होती ती डोळ्यांची सूज पार निवळून बुबुळे स्वच्छ (निर्मळ) झाली. डोळ्यासारखा नाजूक भाग. परंतु बिब्ब्याने मुळीच आग झाली नाही. (अशा) बिब्ब्याने डोळ्याचा (नेत्र) रोग पळविला, असे (बाबांचे) अनेक अनुभव होते. (हे एक मात्र उदाहरणासाठी सांगितले.) (ओ. ४७-५२)

बाबांना धोती पोती माहीत (अवगत) होती. लोकांची नजर चुकवून (नकळत) ते एकान्त जागी जात, आंघोळ करताना (पोटातील) आंतडी ओकून बाहेर काढीत व धुऊन वाळण्यासाठी टाकीत. मशिदीपासून जितकी दूर विहीर (आड) आहे, तितकेच पुढे एक वडाचे झाड आहे. त्याच्याही पलीकडे (दुसरी) एक विहीर आहे. तेथे दोन दिवसाआड ते जात असत. भर दुपारी कडक (प्रखर) ऊन. कोणी तेथे नाही हे पाहून स्वतः विहीरीतून पाणी काढून तोंड वगैरे धूत असत (मुखमार्जन करीत). असो. अशा एका प्रसंगी ते आंघोळीला बसले असताना घाईघाईने (लागवेगी) आंतडी (बाहेर) काढून त्या जागी ते धुऊ लागले. बोकडाला (अजा) कापल्यानंतर खाटकी (कसाई) त्याची आंतडी आतबाहेर (अभ्यांतरी) उघडी करून, धुऊन, घडीवर घडी घालून, चांगली स्वच्छ (निर्मळ चोखडी) करतात, त्याचप्रमाणे (बाबा) आपली आंतडी काढून आंतबाहेर स्वच्छ धुऊन जांबाच्या (पेरूच्या) झाडावर (वाळवायला) पसरत असत व लोकांना खूप आश्चर्यचकित करत असत. त्यांची ही स्थिती डोळ्यांनी पाहिलेल्यांपैकी काही मंडळी अजून शिरडीत उरलेली आहेत. ते म्हणत, "(खरोखरच) ही अजब (अपूर्व) व्यक्ती (वल्ली) होती." ते कधी खंडयोग लावीत तर कधी हातपाय वेगळे (विलग) करीत. मग मशिदीत ठिकठिकाणी (जागोजागी) (त्यांचे) अवयव सुटे पडत. (बाबांच्या) देहाचे तुकडे तुकडे (खंड विखंड) झालेला मोठा (प्रचंड) देखावा पाहण्यासाठी पुष्कळ (उदंड) लोक धावून धावून येत. परंतु त्यांना बाबा अखंड (सर्व अवयव जोडलेले) दिसत. एकदा असा प्रकार पाहून एकजण पाहणारा (गृहस्थ) फार घाबरला. "मशिदीत ठिकठिकाणी चारही कोन्यात बाबांच्या शरीराचे तुकडे (अवयव) दिसत आहेत. मध्यरात्र झालेली आहे. जवळ कोणी नाही. कोणा दुष्टाने बाबांना ठार केले असेल बरे? कोणी हा अत्याचार (जुलूम) केला असेल बरे? कोणाला सांगू म्हणावे तर मीच उलटा टांगला जाईन (गुन्हेगार ठरेन)," असा विचार मनात येऊन तो (पाहणारा) बाहेर जाऊन बसला. बाबांची ही काही योगसाधना असेल असे त्याच्या स्वप्नीही नव्हते. (बाबांच्या) शरीराची ती छिन्नभिन्नता पाहून त्याच्या हृदयात भीतीने धडकच भरली. कोणाला तरी हा प्रकार कळवावा असे त्याच्या मनात फार आले. परंतु प्रथम बातमी देणारा मीच गुन्हेगार ठरेन म्हणून दुसऱ्या कोणाला सांगण्याची त्याला हिंमत झाली नाही. मनात असंख्य कल्पना येऊ लागल्या. म्हणून

पहाटे पुन्हा जाऊन पाहू लागला तर त्याला मोठे आश्चर्य वाटले. पूर्वीचा सर्व प्रकार नाहीसा (अदृश्य) झाला होता आणि बाबा आपल्या जागी खुशाल (कुशल) स्वस्थ बसलेले होते. हे स्वप्न तर नसेल ना असे वाटून तो आश्चर्य करू लागला. हे योग, हे धोतीपोती बाबा बालपणापासून आचरत होते. त्यांची ही योगस्थिती आणि अगम्य गति (गूढ वतनक्रम) कोणालाच कळत नव्हती. (ओ. ५३-६९)

(बाबा) आपल्या (वैद्यकीय हात) गुणाने प्रख्याती पावले आणि गरीब दुबळ्यांना त्यांनी आरोग्य दिले. (परंतु) कोणाच्याही दिडकीला शिवले नाहीत (दवादारू करण्यासाठी पैसे घेतले नाहीत). त्या प्रांतात ते हकीम (मुसलमान वैद्य) म्हणून गाजले (प्रसिद्धीस पावले). हकीम हे तर दुसऱ्यांसाठी (परार्थ) ते होते. स्वतःच्या फायद्यासाठी (निज+स्वार्थी) ते अगदी उदास (बेपर्वा) होते. परक्याचा लाभ साधण्यासाठी (परकिय+अर्थी) ते स्वतः सहन करण्यास कठीण अशी मोठी संकटेदेखील (असह्य+अनर्थी) सहन करीत. याबद्दलची एक विलक्षण (अभिनव) कथा श्रोत्यांना मी वर्णन करतो ज्यामुळे बाबांची व्यापकता (सर्वत्र हजर असणे) आणि दयार्द्रता (दयेचा ओलावा) कळेल. सन १९१० साली दिवाळीत धनत्रयोदशीच्या (धनतेरस) दिवशी बाबा धुनीजवळ सहज लाकडे जाळीत बसले होते. धुनी भयंकर (प्रखर) तापलेली होती. (इतक्यात एकाएकी) त्या धुनीत बाबा आपला हात खुपसून निश्चिंत (स्वस्थ) मनाने बसले आणि हात भाजून निघाला. माधव (फसले ?) नावाचा त्यांचा सेवक त्यांचेजवळ होता. त्याचे सहज लक्ष गेले. माधवराव देशपांडेही शेजारी (नजीक) होते. तेही लगेच धावले व बैठक (बैसका) मारून कमरेला विळखा घालून बाबांना त्यांनी मागे ओढिले. मग ते बाबांना काय विचारू लागले (पुसती) ते पहा. "हा! हा! देवा हे काय केले?" देशपांड्यांनी असे म्हणताच बाबा शुद्धीवर आले आणि म्हणाले, "अरे! बगलेतले (खांकेचे) एक पोर निसटले आणि एकाकी भट्टीत (लोहाराच्या चुलीत) पडले. एका लोहाराची स्त्री (रांड) आपल्या नवऱ्याची हाक ऐकून धाकाने पोराला बगलेत मारून भट्टीचा भाता (लोहाराची विस्तव प्रज्वलित करण्यासाठी वारा फुंकण्याची पिशवी) फुंकू लागली. फुंकता फुंकता लक्ष चुकली (भान राहिले नाही) आणि बगलेत पोर आहे हे विसरली. पोर ती अचपळ (अति चुळबुळी). तेथून (आईच्या खाकेतून) निसटली आणि भट्टीत पडताच मी उचलली. त्या पोरीला काढावयाला मी गेलो तर हा प्रकार घडला. भाजू दे रे मेला माझा हात. पोरीचा प्राण तर वाचला!" (ओ. ७०-८०)

आता या हाताच्या दुखण्यासाठी कोणता आणि कोणाकडून उपाय करवून घ्यावा म्हणून माधवरावांनी चांदोरकरांना (कै. नारायण उर्फ नानासाहेब गोविंद

चांदोरकर. राहणार कल्याण. प्रांताधिकारी. बाबांच्या खास आवडत्या भक्तांपैकी अगदी सुरुवातीचे सन १८९२-९४ पासूनचे सुशिक्षित आणि मोठ्या अधिकारपदावर असलेले भक्त. बाबांनी यांना स्वत:हून एकदा नाही तीनदा आपल्या भेटीस येण्यासाठी निरोप पाठविला होता.) सविस्तर पत्र टाकले. लगेच चांदोरकर मुंबईतील प्रसिद्ध डॉक्टर परमानंद यांना घेऊन शिरडीस आले. जळजळ कमी होण्याला (दाह+उप+शमना) उपयोगी पडतील अशी नाना प्रकारची औषधे घेऊन डॉ. परमानंदासह नानासाहेब साईबाबांच्या चरणाशी येऊन ठेपले. बाबांना नमस्कार करून (अभिवंदून) कुशल वर्तमान विचारले. नंतर येण्याचा हेतू (आगमन+प्रयोजन) सांगून हात दाखविण्यास विनंती केली (हस्त+अवलोकन+प्रार्थिले). आधीच हात पोळल्यापासून दररोज (प्रत्यहीं) भागोजी शिंदे तूप चोळून, (झाडाचे) पान बांधून, घट्ट (करकरून) पट्टया बांधीत असे. तो हात सोडून पहावा, परमानंदांना दाखवावा, औषध उपचार सुरु करावा आणि बाबांना गुण पडावा (बरे वाटावे) ही सदिच्छा मनात धरून नानासाहेबांनी बाबांची पुष्कळ मनधरणी केली. परमानंदांनीही पट्टया सोडून पाहण्याचा प्रयत्न केला. (परंतु बाबांनी) 'आज उद्या' 'आज उद्या' करून, आपला वैद्य अल्ला म्हणून हात पाहू दिला नाही. त्यांच्या मनात (हात पोळल्याबद्दल) मुळीच खेद (पश्चाताप) नव्हता. परमानंदांनी आणलेल्या औषधांना शिरडीची हवा लागली नाही. परंतु त्यामुळे त्यांना साईदर्शनाचा आनंददायक (सुहावा) योग घडून आला. भागोजीचीच प्रत्येक दिवशी (नित्य) सेवाचाकरी असावयाची. भागोजीनेच हात चोळावा. त्यामुळे काही दिवसांनी हात बरा होऊन सर्वांना सुख झाले. जरी असा हात बरा झाला तरी बाबांना काय अतृप्तता (दुकळा) आली कोण जाणे. ती पहाटेची वेळ येता दररोज पट्टयांचा सोहळा (समारंभ) चालूच. हाताला काहीही वेदना (दुखणे) नसताना दररोज त्याची निष्कारण (कारण नसताना) जोपासना (निगा राखणे) व निष्पीडन (दुखणे नसताना) घृतमर्दन (तूप चोळणे) आमरणान्त (देहत्यागापर्यंत) चालविले. भागोजीच्या या उपासनेची (सेवेची) अणिमादि अष्ट सिद्धी प्राप्त असलेल्या (सिद्ध) साईबाबांना (मुळीच) गरज नव्हती. (परंतु) भक्ताच्या कल्याणाच्या (भक्त+काज) आवडीमुळे भागोजीची ती नित्यनेमाची उपासना ते घडवून घेत होते. पूर्वजन्मींच्या महापापांमुळे रक्तपितीसारख्या महारोगाचे दु:ख (कुष्ट-क्लेश) भागोजीच्या नशिबी आले होते. परंतु त्याचे भाग्य विशेष की त्याला साईबाबांचा सहवास लाभला. (बाबांची) लेंडीबागेवर फेरी निघाली की भागोजी त्यांचा छत्रधारी असे (उन्हापासून संरक्षणकरिता छत्री धरून मागे चालत असे). शरीर रक्तपितीने भरलेले (कुष्ठरोगामुळे नाकातोंडातून रक्तस्राव होत असलेला). परंतु बाबांच्या सेवाचाकरीसाठी त्याचा पहिला नंबर (प्रथम) लागत असे. दररोज मोठ्या पहाटे उठून जेव्हा बाबा धुनीशेजारी खांबाशी (स्तंभापाशी) टेकून आरामाने

बसत तेव्हा भागोजी (भाग्या) सेवा करण्याकरिता हजर होत असे. हातापायाच्या पट्ट्या सोडणे, त्या त्या जागीच्या मांसल भागांची (स्नायू) मालीश करणे (मसळणे) आणि मालीश केलेल्या जागी तूप चोळणे वगैरे सेवा भागोजी करत असे. पूर्वजन्मींचा महापापिष्ट भागोजी शिंदे रक्तकुष्ठाने सर्व अंग भरलेला असा महाव्याधिष्ठ (मोठ्या भयंकर रोगाने ग्रस्त) होता तरीपण बाबांचा तो वरिष्ठ (श्रेष्ठ) भक्त होता. रक्तपितीने (हातापायांची) बोटे गळून पडली होती (झडली), घाण वासामुळे (दुर्गंधीने) सर्व अंग किळसवाणे (ओखटे) झाले होते. असे ज्याचे कमनशीब (दुर्भाग्य) होते तरी त्याचे (बाबांची) सेवा करण्याच्या सुखामुळे उत्कृष्ट (चोखटे) भाग्य झाले होते. (सेवा करण्यासाठी कोणीही येवो, साईबाबांनी कोणाचा कधीही अव्हेर केला नाही, उलट त्याला प्रेमानेच वागविले. याविषयींची दोन उदाहरणे – भीमाबाईचे व दगडूभाऊचे – संस्थानने प्रकाशित केलेल्या पोथीतील टीपेत सविस्तरपणे सांगितलेली आहेत.) (ओ. ८१-९९)

साईबाबांच्या अगाध लीला किती म्हणून मी वर्णन करू! शिरडी गावात एकदा ग्रंथिज्वर (प्लेग) आला. त्यावेळी जो चमत्कार घडला तो ऐका (परिसा). दादासाहेब खापडर्यांचा (अमरावतीचे कै. गणेश श्रीकृष्ण खापर्डे. हे त्या काळचे नामांकित वकील, इंडिया सरकारच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे मेंबर आणि लोकमान्य टिळकांचे खास सहकारी होते.) एक लहान वयाचा मुलगा (बळवंत) आपल्या आईबरोबर साईबाबांच्या सहवासाचा आनंद लुटत होता. आधीच तो मुलगा लहान. त्याला फणफणून ताप आला. आईचे हृदय उचंबळून (उलून) आले आणि तिचे मन अस्वस्थ झाले. राहण्याचे ठिकाण (वसति स्थान) अमरावती (विदर्भातील जिल्ह्याचे गाव) होते. तेथे (परत) जावे (करावे प्रस्थान) असा विचार तिच्या मनात आला. (मग ती) संध्याकाळची वेळ साधून बाबांची आज्ञा घेण्यासाठी आली. संध्याकाळची (अस्तमानची) (लेंडीची) फेरी आटोपून बाबा वाड्याच्यापाशी आले असता त्या बाईने जवळ जाऊन बाबांचे पाय धरले आणि घडलेली सर्व गोष्ट निवेदन केली. आधीच स्त्रियांची जात घाबरी. त्यात मुलाची शिरशिरी म्हणजे थरथर कापणे थांबत नव्हते. ग्रंथिज्वराची (प्लेगाची) भीतीपण भारी (फार) होती, (म्हणून) घडलेले सर्व ती (पुन्हः पुन्हः) नीट सांगू लागली. त्यावर बाबा सौम्य (मृदु) शब्दात म्हणाले, ''आकाशात ढग आले आहेत (आभाळ आले आहे, म्हणजे संकटे आली आहेत), पाऊस पडून पिके पिकतील आणि ढग वितळून जातील (संकटे आली तशी निघून जातील). भिता कशाला (किमर्थ)?'' असे म्हणून आपली कफनी कमरेपर्यंत वर उचलून (स्वतःचे अंगावर) ताज्या आणि चांगल्या टवटवून उठलेल्या गाठी (ग्रंथी) सर्वांना दाखविल्या. कोंबडीच्या (कुक्कुटीच्या) अंड्याएवढ्या त्या चार गांठी चारी

बाजूला होत्या. बाबा (आणखी) म्हणाले, "हे पहा! तुमच्यासाठी मला हे संकट (सांकडे) भोगावे लागते." बाबांचे असे हे दिव्य आणि अलौकिक कृत्य (कर्म) पाहून लोक आश्चर्यचकित झाले. आपल्या भक्तांसाठी संत अनेक दुःखे कशी भोगतात पहा! त्यांचे हृदय मेणापेक्षाही (जनावरांच्या शरीरातून किंवा वनस्पतीपासून काढण्यात येणारा चिक्कट, घट्ट, चरबीसारखा पदार्थ ज्यापासून मेणबत्ती वगैरे तयार करतात) मऊ असते. आतून बाहेरून जणूकाय लोणीच (नवनीत). त्यांचे भक्तांवरचे प्रेम स्वार्थाशिवायचे (लाभेवीण प्रीत) असते. भक्तच त्यांचे जातिबांधव (गणगोत) असतात. (ओ. १००-११०)

एकदा असा प्रकार घडला (वर्तला). नानासाहेब चांदोरकर नंदूरबार (धळे जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण) सोडून पंढरपुरास (सोलापूर जिल्ह्यातील विठोबाचे मंदिर असलेले प्रसिद्ध क्षेत्र) जाण्यास निघाले. नानासाहेब मोठे भाग्यशाली. साईंची अनन्य सेवा फळास आली. पृथ्वीवरील वैकुंठाची म्हणजे श्री विष्णूच्या निवासस्थानाची प्राप्ती (भू+वैकुंठ+प्राप्ति) झाली. (एवढेच नव्हें तर) तेथील मामलत मिळाली (मामलतदार म्हणून नेमणूक झाली). नंदूरबारी हुकूम येताच लगेच (सत्वरी) हजर व्हावयाचे होते म्हणून तातडीने (निघण्याची) तयारी केली. मनात (विठोबाच्या) दर्शनाचाही हेतू होता. (इतक्यात) विचार आला की सहकुटुंब सहपरिवार शिरडीला जावे. शिरडीच प्रथम पंढरपूर आहे. बाबांना नमस्कार करावा (आणि मगच पुढे जावे). कोणाला पत्र पाठविले नाही. निरोपही धाडला नाही. सर्व सामान आवरून लगबगीने गाडीत बसले. असे जे नानासाहेब निघाले त्याची शिरडीत कोणलाच खबर नव्हती. परंतु साईबाबांना ते सर्व समजले होते. त्यांची नजर सर्व ठिकाणी ना! नानासाहेब सत्वर निघाले. निमगावच्या सीमेवर असतील तोच शिरडीत मोठा (साचार) चमत्कार घडला तो ऐका. बाबा मशिदीत म्हाळसापती, आप्पा शिंदे व काशीराम शिंपी या भक्तांसह गोष्टी करत बसलेले होते. इतक्यात बाबा म्हणाले की आपण चौघे मिळून भजन करू या. पंढरीचे (पंढरपुराच्या मंदिराचे) दरवाजे उघडले आहेत. भजन आनंदाने चालवू या. साईबाबांना तिन्ही काळांचे (भूत, भविष्य व वर्तमानाचे) संपूर्ण ज्ञान होते (त्रिकाल+ज्ञाता). (नानासाहेब पंढरपुराला जाण्यासाठी निघाल्याची) ही वार्ता त्यांना कळून चुकली होती. नानासाहेब सीमेवरच्या 'शिवा' ओढ्याजवळ आले असताना बाबांना भजन करण्याचा आनंद लुटण्याची इच्छा (भजन+उल्लासता) झाली.

### भजन

**पंढरपूरला जायाचें जायाचें। तिथेंच मजला राह्याचें।**
**तिथेंच मजला राह्याचें राह्याचें। घर ते माझ्या रायाचें।।**

स्वत: बाबा भजन म्हणू लागले, जवळ बसलेले भक्त ते पुन्हः म्हणून साथ देऊ लागले (अनुवाद करिती) आणि पंढरीच्या (विठोबाच्या) प्रेमात रंगून गेले. इतक्यात नानासाहेब आले. सहकुटुंब पायाशी लागले (नमस्कार केला) व म्हणू लागले, ''महाराजांनी आता आमच्याबरोबर पंढरपुराला चलावे आणि निवांत (शांतपणे) व निश्चिंत (स्वस्थ मनाने) तेथे बसावे.'' (परंतु) या विनंतीची गरजच नव्हती. बाबांची आधीच असलेली पंढरपुराला जाण्याबद्दलच्या भजनाची आवड असलेली स्थिती (उल्हास वृत्ती) लोकांनी त्यांना सांगितली. बाबांची ही लीला पाहून नानासाहेब आश्चर्यचकित झाले आणि त्यांनी सद्गदित होऊन (कंठ दाटून येऊन) बाबांचे चरणी मस्तक (डोई) ठेवले. नंतर आशीर्वचनासह (दिलेला) उदीप्रसाद (भक्तिप्रेमाने) मस्तकी लावून ते पंढरपुराकडे जाण्यास निघाले. (ओ. १११-१२५)

अशा (कितीतरी) गोष्टी सांगू जाता ग्रंथाचा व्याप वाढेल म्हणून हा 'परदुःख-निवृत्तिता' (दुसऱ्यांचे दुःख निवारण करण्याचा) विषय आटोपता घेऊ या. बाबांच्या चरित्राला अंत नाही. तेव्हा हा अध्याय आता संपवू या. पुढील अध्यायात बाकीच्या इतर (अवांतर) कथा मी माझ्या स्वतःच्या कल्याणाकरिता (स्वहितालागी) सांगेन. ही मीपणाची अहंवृत्ती (अहंकार) मनात जिरवू (दबवू) जाता जिरत नाही. हा मी कोण हे निश्चितपणे कळत नाही. साईबाबाच स्वत: आपले चरित्र (कथा) सांगतील. मनुष्य (नर) जन्माचे महत्त्व सांगतील, आपल्या भिक्षेचा वर्तनक्रम (निज+भैक्ष्य+वृत्ति) वर्णन करतील. बायजाबाईची (तात्या कोते पाटलाच्या आईची) भक्ती व आपले भोजन कौतुकही सांगतील. म्हाळसापतीला आणि तात्या कोते पाटलाला बरोबर (सर्वे) घेऊन बाबा मशिदीत कशा तऱ्हेने झोपत तेही ऐका. हेमाडपंत साईबाबांना शरण आले आहेत. 'मी भक्तांच्या पायांची चप्पल (वहाण) आहे' असे ते म्हणवून घेतात. त्यांना साईबाबांची आज्ञा हाच आधार (प्रमाण) आहे. येथवर निरूपण (वर्णन) झाले. (ओ. १२६-१३१)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या श्री साईसमर्थ यांच्या सत्यचरित्राचा ''विविध कथा निरूपणं'' (नाना प्रकारच्या गोष्टींचे वर्णन) या नावाचा सातवा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्गुरु साईनाथांना अर्पण असो. सर्व मंगल असो.**

## विष्णु सहस्रनाम . . . ३

विष्णुसहस्रनाम हे महाभारतातील अनुशासन पर्वात असल्याचे पूर्वीच नमूद केले आहे. महाभारताची एकूण मुख्य पर्वे १८ आहेत. त्यातील १३ वे पर्व हे अनुशासन पर्व आहे. विष्णुसहस्रनाम हे १३५ वा अध्याय म्हणून त्यात आलेले आहे.

महाभारताची मुख्य पर्वे १८ आहेत ती अशी-आदि, सभा, वन, विराट, उद्योग, भीष्म, द्रोण, कर्ण, शल्य, सौप्तिक, स्त्री, शान्ति, अनुशासन, आश्वमेधिक, आश्रमवासिक, मौसल, महाप्रस्थान व स्वर्गारोहण. या अठरा पर्वाव्यतिरिक्त १९ वे म्हणता येईल असे 'हरिवंश' नावाचे खिलपर्व आहे. खिल म्हणजे मागून जोडलेले. अर्थात संपूर्ण महाभारत ग्रंथ म्हणजे हरिवंशासहित समजला जातो.

महाभारत हा एक जगन्मान्य ग्रंथ आहे. त्याची विशेष प्रसिद्धी त्यातील भगवद्गीतेमुळेही झालेली आहे. अर्थात मूळग्रंथही तोला-मोलाचा आहेच. त्यामुळे जगातील विद्वानांचे लक्ष त्याकडे वेधले गेल्यास नवल नाही. भारतीयांच्या दृष्टीने महाभारत हा राष्ट्रीय ग्रंथ आहे एवढे त्याचे महत्त्व आहे. गेली हजारो वर्षे हा ग्रंथ आम्हा आबालवृद्धांच्या जीवनात अभावितपणे कोरला गेलेला आहे. वेद, रामायण व महाभारत हे भारतीयांचे प्राण आहेत असे म्हटले तरी अतिशयोक्ति होणार नाही. हे वगळून भारतीय संस्कृति म्हणजे निष्प्राण कलेवर! नुकतीच टी.व्ही. वर महाभारत ही प्रदीर्घ मालिका होऊन गेली. अर्थात् महाभारत हा प्रचंड ग्रंथ असल्याने त्याचे यथार्थ चित्रणही तितकीच अवघड गोष्ट असून थोडया कालावधीत संपणारी नाहीं.

### — महाभारताचे स्वरूप —

आज आमच्यासमोर असलेले महाभारत हे जवळ जवळ एक लाख श्लोकांचे आहे. त्याच्या या प्रचंड विस्तारामुळेंच त्याला महा-मोठे भारत असे सार्थ नाव दिले गेले आहे. काळाच्या ओघात या ग्रंथांत कशी स्थित्यंतरे झाली ते आपण थोडक्यात पाहू या.

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्।**
**देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत्।।१।।**

महाभारताचा प्रारंभ या श्लोकाने व्यासांनी केलेला आहे. यात नारायणाला व नराला म्हणजे अर्जुनाला नमन, तसेच सरस्वतीला नमन करून 'जय' ग्रंथाचा आरंभ

आहे. महाकवि व्यासांनी काव्याचे नायक श्रीकृष्ण-अर्जुन, जय व वाग्देवता-सरस्वती यांचे स्मरण करून कौशल्याने हा ग्रंथ लिहिला. आदि पर्वात व नंतर शेवटी स्वर्गारोहणपर्वात –

**जयो नामेतिहासोऽयं श्रोतव्यो भूतिमिच्छता।**

म्हणजे हा 'जय' नावाचा इतिहास असून वैभव हवे असणाऱ्याने ऐकावा असें म्हटले आहे. तसेच –

**चतुर्विंशतिसाहस्त्रीं चक्रेभारतसंहिताम्।**

आदिपर्व-१-६१

'चोवीस हजार श्लोक असलेलें भारत' असेहीं आदिपर्वात प्रारंभी म्हणून –

**एकं शतसहस्त्रं च मयोक्तं वै निबोधत।**

आदिपर्व १-१०९

'एक लाख श्लोकांचे महाभारत मी सांगितले', असे सौतिने म्हटले आहे. या सर्वांचा अर्थ असा निघतो की प्रथम व्यासांनी 'जय' नावाचा ग्रंथ करून त्यांच्या शिष्याने म्हणजे वैशम्पायनाने जनमेजयाला सर्पयज्ञप्रसंगी २४,००० श्लोकांचे भारत म्हणून कथन केले. सौतीने म्हणजेच लोमहर्षणाचा मुलगा 'सूत' याने ते नैमिषारण्यात तप करीत असलेल्या ऋषींना एक लाख श्लोकांचे 'महाभारत' म्हणून सांगितले.

सौतीने १८ पर्वांच्या महाभारताची एकूण १०० उपपर्वांत विभागणी केली आहे. त्यांत अनेक आख्याने म्हणजे कथा आहेत. सौतीने त्यात अनेक उपाख्यानांची म्हणजेच उपकथानकांची भर घातलेली आहे. दुष्यंत-शकुंतला, ययाति-देवयानी, जरासंधवध, नल-दमयंती, अष्टावक्र, सावित्री-सत्यवान, त्रिपुरवध जनक, हयग्रीव, पुरुरवा-ऊर्वशी, मुचकुन्द, विश्वामित्र-मेनका, च्यवन, नचिकेत, तारकासुरवध, कृष्णाचे निर्याण, इत्यादी आपणास परिचित असलेली कथानके यात आहेत. याशिवाय अनेक अपरिचित कथानकेही आहेत. या सर्व कथानकांना प्रसंगाप्रसंगाने सौतीने स्थान दिले आहे. द्यूतात हरल्यानंतर पाण्डव वनवासात गेले असतांना तेथेही असा वनवास कोणाच्या वाट्याला आलेला आहे यावरून संपूर्ण रामकथा यांत आलेली आहे. थोडक्यात महाभारताने अगणित साहित्यिकांना खाद्य पुरविले आहे. संस्कृतच काय पण प्राकृत भाषेतील अनेक नामवंतांनी या कथानकांवर अमर वाङ्मय निर्माण केले आहे. कवि कुलगुरु कालीदासाचे शाकुंतल ही त्यातली एक अमर कृति.

भगवद्गीता हे तर महाभारताचे अमोल लेणे. पण गंमतीची गोष्ट

म्हणूया-महाभारतात अनेक गीता आहेत. श्रीकृष्ण-अर्जुनाची भगवद्गीता तशा अक्षरगीता, हारितगीता, वृत्रगीता, शम्याकगीता, वामदेवगीता इत्यादी अनेक गीता आहेत. अर्थात भगवद्गीतेची सर या गीतांना आलेली नाही व गीता म्हणजे भगवद्गीता वळेच आम्ही कायमचे लक्षात ठेवतो.

विष्णुसहस्रनामाचा विषय चालला आहे. त्याच महाभारतात शिवसहस्रनामही आहे. तेही याच अनुशासनपर्वात १७ वा अध्याय म्हणून आलेले आहे.

महाभारत हा प्रामुख्याने धर्म व नीति यांचे समर आहे. जागोजागी धर्मचर्चा आहे. एखादी गोष्ट मग ती साधी असो, छोटी असो, मोठी असो, प्रत्यक्ष भगवान् कृष्णाशी संबंधित असो, त्यावर साधक-बाधक दोन्ही विचार आहेत, चर्चा आहेत, वाद-विवाद आहेत व त्यांतून चिरस्थायी ठरेल, कोणत्याही काळीं उपयुक्त ठरेल असा निर्णय दिलेला आहे.

धर्माचे सर्व विषय आलेले आहेत. वन, उद्योग, शान्ति, अनुशासन या पर्वात अतिशय महत्त्वाचे धर्म-नीतिचे विषय सविस्तर आलेले आहेत. धर्म म्हणजे कर्त्तव्य. जन्मापासून मरेपर्यंत प्रत्येक जीव हा आपल्या कर्त्तव्यकर्माने बांधलेला आहे व ते त्याने पार पाडलेच पाहिजे असा आग्रह सर्वत्र आहे. माणूस म्हणून सर्वत्र विचार झालेला आहे. त्यांत हिंदु वा इतर असा उल्लेख नाहीं तर माणूस म्हणून जन्माला आलेला प्रत्येक जीव व त्याची कर्त्तव्ये यात सांगितली आहेत. राजा व प्रजा यांची कर्त्तव्ये, युद्धनीति, राजधर्म, आपद्धर्म, अध्यात्म, योग, सांख्य, भक्ती, दान, कर्मफल, तीर्थे, स्त्रीधर्म, पुत्रधर्म, यम-नियम, वर्णाश्रमधर्म, व्रत-वैकल्ये असे अनेक विषय यात आलेले आहेत. त्या विषयाला अनुरूप कथानक व त्यातून निघालेला मार्ग अशी सर्वत्र मांडणी आहे. अर्जुन, भीम, धृतराष्ट्र, शकुनि, दुर्योधन, धर्मराज, दुःशासन, द्रौपदी, कुंती, गांधारी, भीष्मपितामह ही पात्रे केवळ महाभारतातच होती व आज नाहींत काय? ही पात्रे व्यासांनी अमर केली. ही कोणत्याही काळांत उत्पन्न होणारी पात्रे असून समस्या निर्माण करणारी आहेत हे मानवी जीवनातले सत्य त्यांनी प्रभावीपणे मांडले व कोणत्याही परिस्थितीतून मार्ग दाखविला आहे. या ग्रंथाची हीच महती आहे. या ग्रंथात जे नाहीं ते इतरत्र कोठें नाहीं कारण महाभारत हा मानवी जीवनाचा ग्रंथ आहे. त्यातले समर-युद्ध हे त्यापूर्वीही मानवाला भेडसावीत होते व त्यानंतरही आजतागायत भेडसावीत आहे. केवळ वर्णने केली असती तर एक महाकाव्य म्हणून त्याची संभावना होऊन तो केवळ साहित्याचा विषय झाला असता. पण महाभारत हा मानवी जीवनाला प्रेरणा देणारा ग्रंथ आहे हीच त्याची थोरवी. माणसाच्या जीवनात केव्हां, कोठे व कोणता प्रसंग वाढून येईल याची खात्री नसते. पण आलेल्या प्रसंगाला

कसे तोंड द्यावे, मार्ग काढावा हे महाभारत शिकवते म्हणून त्याची थोरवी गायची. मानवजात जोपर्यंत आहे तोपर्यंत महाभारत हे प्रत्यक्ष घडणारे असल्याने चिरंतन राहणार. माणूस विज्ञानवादी, साम्यवादी, लोकशाहीवादी कसाही होवो. त्याच्या जीवनात महाभारतापासून सुटका नाही. म्हणून व्यासांनीं हा अमोल ठेवा देऊन ठेवला आहे. स्वर्गारोहण पर्वात म्हटले आहे–

**धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ।**
**यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित्॥३८॥**

जे या ग्रंथात आहे तेच इतरत्र आढळेल व यात जे नाहीं ते इतरत्र क्वचितच् आढळेल. व्यासांची ही उक्ती महाभारत संपूर्ण वाचल्यावर लक्षात येते. श्री ज्ञानेश्वर माऊलींनी आपल्या गीतेवरील टीकेत (ज्ञानेश्वरीत) म्हटलेले आहे–

**म्हणोनि हा काव्यारावो। ग्रंथगुरवतीचा ठावो।**
**एथूनि रसा झाला आवो। रसाळपणाचा॥१-३३॥**

काव्यांचा राजा असलेला हा महाभारत ग्रंथ म्हणजे रसाच्या रसाळपणाचा डौलाने प्रारंभ असून शब्दांना शास्त्रीयता याने दिली, ब्रह्मज्ञानाला मृदुता आणली, येथे चातुर्याला शहाणपण दिले, तत्त्वांना रुची मिळाली, सुखाला सौभाग्य प्राप्त झाले, इत्यादी वर्णनांनी माऊलींनी या ग्रंथाचे श्रेष्ठत्व अपूर्वतेने वर्णन केले आहे. व्यासांच्या प्रतिभेला भुलून अनेक कथानके भारताकडे धावली आणि मोठेपणाच्या हौसेने त्यांनी महाभारताचा आश्रय घेतला असे माऊलींनी सांगून महाभारताची थोरवी अशी गायली–

**म्हणऊनि महाभारती जे नाहीं। ते नोहेचि लोकी तिही।**
**येणे कारणे म्हणिपे पाही। व्यासोच्छिष्ट जगत्रय॥१-४७॥**

महाभारताच्या रूपाने हीं तिन्ही विश्वे त्यांच्या (व्यासांच्या) उच्छिष्ट रूपाने आहेत असे माऊलींना वाटले.

बाबांना या ग्रंथाची महती शामाच्या रूपाने व विष्णुसहस्रनामाच्या निमित्ताने मांडायची होती. शामा व रामदाशी निमित्तमात्र झाले. याद्वारे असंख्य भक्तांचे कल्याण त्यांना साधून द्यावयाचे होते.

(क्रमशः)

# ॐ (ओंकार)

- वैद्यराज भाऊसाहेब कुळकर्णी
मुंबई.

ॐकार बिंदु संयुक्तं नित्यं ध्यायन्ति योगिन: ।
कामदं मोक्षदं चैव ॐकाराय नमो नम: ।।

परब्रह्म परमात्म्याचा पत्ता सांगताना संतानीं तो परमात्मा '**श्वासन के श्वास**, असा सांगितला आहे–

**क्यों तूं मुझको ढुंढे बंदे। मैं तो तेरे पास में।।**
**ना मंदीर में ना मस्जिद में। ना काशी-कैलास में।।**
**ना मुरत में ना तीरथ में। ना दया धर्म दान में।।**
**ना मैं जप में ना मैं तप में। ना योगी सन्यास में।।**
**है तो तेरे पास बंदे। मैं श्वासन के श्वास में।।**

**महाप्रलय समयासी। सप्तार्णव मिळणी जैसी।**
**तैसा या श्वासोच्छ्वासी। ईश्वर बैसलासे।।**

–गुरुचरित्र

**श्वासन का श्वास**- म्हणजे आपण घेत असलेल्या श्वासाचें मूळस्थान (प्रारंभस्थान) लक्षात घेतले पाहिजे. श्वासाची उत्पत्ति परावाणीत होतें असें शास्त्र सांगते; आणि ॐ हा शब्द परावाणीतूनच उत्पन्न होतो. श्वास म्हणजे (प्राण) व ॐ या दोघांचे उत्पत्तिस्थान एकच आहे. अव्यक्तातून व्यक्त होण्याची परब्रह्माची सुरवात परावाणीतूनच होते. स्थळ, काळ यांची बांधलेली नाशवंत आकारता येथूनच सुरू होते. समर्थ म्हणतात–

**निश्चल चंचळाचा संधी। तेथे भांबावते बुद्धि।।**

परावाणी व अपरातत्व यांचा ॐ हा संधी आहे. अपरातत्व म्हणजे निर्गुण ब्रह्मतत्व, हें निर्गुण ब्रह्मतत्व परावाणीच्या पलिकडे आहे– '**जें परेच्याही पलीकडे।**' असें संतवचन आहे. श्वासाचा आरंभ परावाणीपासूनच आहे; तेथूनच सगुण-ब्रह्माच्या भासमय जगताची सुरवात आहे; म्हणून ॐकाराचें महत्त्व फार आहे. श्वासाची उत्पत्ति

ॐपासून असल्याने ''मैं'' श्वासन के श्वास में असें जें प्रारंभी सांगितलें आहें, तें श्वासाचें मूळ उत्पत्तिस्थान म्हणजेच निर्गुणब्रह्मतत्व होय. हें समजावून सांगण्याकरताच ''श्वासाचा श्वास'' हा गूढार्थदर्शक शब्द-प्रयोग केलेला आहे. प्राणाची उत्पत्ति व वाणीची म्हणजे ॐची उत्पत्ति ही दोन्ही एकाच स्थानातून होते हें स्पष्ट करण्याचा हेतू आहे; आणि परेच्याहि पलिकडील स्वरूप हें आपले स्वरूप आहे असें वरील काव्यात सूचित केलें आहे. प्राण (श्वास) व वाणी (ॐ) या ब्रह्माच्या उपाधि आहेत, मूळ परब्रह्म हें निरुपाधिक स्वरूपाचें आहें, हें स्पष्ट केलें आहे.

श्वासोच्छ्वासाची शास्त्रीय मीमांसा करताना आपणास योगशास्त्राकडे वळावे लागते. हल्ली प्रचारात जो 'योगा' म्हणून समजतात तो हा योग नव्हे. 'योगा' फक्त आरोग्यासनें या अर्थानें आहे. ती प्रत्यक्ष योगासने नव्हेत. 'योगासन' म्हणजे चित्तवृत्तींचा प्राणायामादि साधनांनी निरोध करून शरीराची साधलेली शांत अवस्था. ही जाणीव पूर्वक प्राप्त करून घ्यावयाची असल्यानें तिचें महत्त्व अध्यात्मात फार आहे. ते पातंजल योगाशास्त्राच्या अभ्यासानेंच फक्त जमतें. आरोग्यासनांनीं नव्हे.

**''योग: चित्तवृत्ति निरोध: ।''**

–पातंजल योगशास्त्र

वाणीला सुरुवात ॐपासूनच होते म्हणून 'आद्य' म्हणजे अगोदरचा तो आहे; व तेथूनच श्वासालाही सुरुवात होते. म्हणून श्री ज्ञानेश्वर माऊली ॐला प्रथम नमस्कार ग्रंथारंभी करतात. **''ॐ नमोजी आद्या।''** हा प्रथमचा नमस्कार आत्मदेवाला तें करीत नाहींत, कारण नमस्कार करणाऱ्याला सुद्धा सर्वत्र सर्वव्यापी परब्रह्माला नमस्कार करतां येत नाहीं. नमस्काराकरतां लागणारे द्वैत तेथें नाहीं. **देव पहावया गेलो। देवचि होऊन ठेलो।** त्यांनी केलेलें नमन ॐला केलें आहे आणि पुढें तें म्हणतात– **''देवा तूंचि गणेशु। सकलार्थ मती प्रकाशु।** हाच ॐकार गणपती, गजानन होय. अशाप्रकारचे माऊलींचे नमन ज्ञानेश्वरीच्या प्रारंभी आलेले आहे.

**स्तुती कांहीं न होणें। पूजा काही न करणें। स्वनिध काही न होणें। तुझ्या ठायी।।**

–ज्ञानेश्वरी १८-२५

अशी वस्तुस्थिती असल्यानें श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणतात–

**'तरी नुरोनि वेगळेपण। रसिभजिनले लवण। तैसें नमन माझें जाण।**

[...] काय बोले।।

—ज्ञानेश्वरी १७-१८

ॐ बद्दल श्री एकनाथ महाराजांचें स्पष्टिकरण—

मात्रात्रय मिळणी लोक। ॐकार बोलती आवश्यक।
हा ॐकार अलौकिक। अतिसूक्ष्म देख देहस्थ।।
आधारचक्री परावाचा। स्वाधिष्ठानी जन्म पश्यंतीचा।।
मणिपुरीहुनि विशुद्धिचा। ठायी मध्यमेचा रिगुबिगु।।
देखोनिया मुखद्वारी। वाचा प्रकाशे वैखरी।।
ते स्वर वर्ण उच्चारी। नाना मंत्री गर्जत।।

—एकनाथी भागवत, २१ वा अध्याय, ओवी ४२१,२२,२६

साडेतीन मात्रांच्या मिळणीला ॐकार म्हणतात. तेथूनच चार प्रकारच्या वाणी [...]रूपण पावतात. मूलाधार चक्राच्या ठिकाणी परावाणीचा जन्म झालेला आहे.

योगशास्त्राचें मतानें शरीरांत सहा चक्रांचे वर्णन आहे. चक्रें म्हणजे शरीरातील [...]यूंचा पुंजका (सूक्ष्मसाठा) होय. ज्ञानवाहिन्या, रक्तवाहिन्या त्यांना जोडलेल्या [...]सतात. मूलाधार चक्राचें स्थान वृषण व गुद यांचे मध्यावर आहे. स्वाधिष्ठान चक्राच्या [...]काणी पश्यंती वाणीचें स्फूरण होतें. हें चक्र 'नाभि'चें खाली असतें. मणिपूर [...]क्रापासून विशुद्ध चक्रापर्यंतचा प्रांत मध्यमा वाणीचा आहे. मुखांत वैखरीचा प्रारंभ [...]तो. तेथें स्वर, वर्ण, व्यंजनें इत्यादिकांचा जन्म होतो.

अनाहत चक्र हृदयाचें ठिकाणी आहें असें योगशास्त्राचें मत आहे. तेथें रात्रंदिवस [...]खंड ध्वनी चालू असतो. फुफ्फुसे व हृदय यांचें जें अविरत कार्य चालू आहें त्याचा [...]वाज आपण कानांत बोटें घातली म्हणजे ऐकू येतो.

आज्ञा-चक्र हें भुवयांमध्यें नाकाच्या शेवटी जो खोलगट भाग आहे त्या ठिकाणी [...]हे. त्याचे वर पोकळी आहे त्याला चिदाकाश म्हणतात. आमचें मनोगत सांगावयास [...]णी शिवाय दुसरा मार्ग नाही. भजन, पूजन इत्यादी कार्यांत प्रथम गणेशाला वंदन, [...] कार्य यशस्वी व्हावें म्हणून करतात तें वंदन ॐलाच आहे.

तात्पर्य ॐकाराशिवाय आमचे पानही हलत नाहीं. म्हणून आम्हाला वाणी [...]वतेला नमस्कार करणें अगत्याचे आहे. वाणी देवता म्हणजे ॐचे प्रगटीकरण, [...]णजेच श्री गणेश, गजानन, विघ्नहर्ता अशी नांवे ॐ या देवतेला दिलेली आहेत.

श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं केलेलें नमन या गणेश देवतेला आहे, परमात्म्याला नव्हे. कारण परब्रह्म तत्व सर्वत्र एक असल्यानें व तेथें मन, वाणी, बुद्धि पोहोंचत नाहीं. म्हणून वाणीचे प्रारंभस्थान जे ॐ त्याला नमन आहे– ''यतो वाचानिवर्तंते अप्राप्य मनसासह। नमन तर आहेच पण तें असें आहें.

मुळीं मुख्य ब्रह्म 'ओंकार'। तें एकचि झालें त्रिप्रकार।
अकार उकार मकार। सत्वादि विकार गुणत्रयात्मक।।
गुणत्रय समसमान। त्या नाव बोलिजे 'प्रधान'।
तेंचि क्रिया शक्तिसूत्र जाण। तेथें प्रगटल्या ज्ञाना 'महत्तत्व म्हणती।।

प्राणस्य शोधयेन्मार्ग पूरकुंभकरे चक्रै: ।
विपर्ययेणापि शनैरभ्यसेन्निर्जितेंद्रिय: ।।

तैसे ये योगाभ्यासी जाण। न चले जाणीव शहाणपण। जाणिवा येथ होय पतन। सर्वथा गमन घडेना।।२७।। तें मुंगीच्या परी योगपंथा। जो शनै: शनै: अभ्यासता। प्रणवाच्या चढे माथा। जाण तत्वता उद्धवा।।२८।। दृढ अभ्यास आल्या हाता। जैशी साधकाची मनोगतता। तैसा पवन चालें तत्वतां। जेवी रणा आंतौतामहाशूर।।२९।। अभ्यासाच्या गडाडी। प्राण खवळल्या कडाडी। तो प्राणपानांचे भेद मोडी। पदर फोडी चक्राचे।।४३०।। येथ द्विविध माझें भजन। एक तें योगयुक्त निर्गुण। एक तें प्रणवाभ्यासें भक्त सगुण। तेंही लक्षण अवधारी।।४३१।। ऐक प्राणायामाचे भेद। सगर्भ अगर्भ द्विविध। सगर्भ आगमोक्ते शुद्ध। सगुण संबंध ध्यानादि।।४३२।।

हृद्यविच्छिन्नमोंकारं घंटानादं बिसोर्णवत्।
प्राणेनोदीर्य तत्राथ पुन: संवेशयेत्स्वरम्।।

वाचेसी नव्हता गोचरू। दीर्घ प्रणवाचा उच्चारू। हृदयीं अनवच्छिन्न ओंकारू। अखंडकारू उल्हासे।।४३३।। घंटानाद सदृश स्थितू। जैसा कमलमृणालसूक्ष्मतंतू। तैसा मूळादारभ्य ब्रह्मरंध्रांतु। प्राणायामयुक्त प्रणवू भासे।।३४।।

तेथ दीर्घ स्वरें उच्चारू। तेणें प्रणवू भासे अति सपुरू। तो प्राणायामे करावा स्थिरू। अखंडकारू स्वरयुक्त।।३५।। एवं प्रणवसंयुक्तं प्राणमेव समभ्यसेत्। दशकृत्वस्त्रिषवणं मासादर्वाग् जिता निल: ।।३५।।

स्वरवर्ण मात्रातीत पर। प्रणव जो कां अगोचर। तो अभ्यास बळें नर। वृत्ति गोचर स्वयें करिती।।३६।। नवल उच्चाराचा चमत्कार। उर्ध्वमुख अखंडाकार। अभ्यासें प्रणवू करिती स्थीर। झणत्कार स्वरयुक्त।।३७।। ऐसा प्राणायामयुक्त प्रणवाभ्यास। त्रिकाळ करिता सांडुनि आळस। काळी आवर्तन द्वादश। सावकाश करिता पै।।३८।। तरी एक मास न लागता। हा प्राण जयो आतुडे हाता। जेवी का सती पतिव्रता। नुल्लंघी सर्वथा पतिवचन।।३९।। ये अभ्यासी अतितत्पर। झालिया गा निरंतर। योगाभ्यासाचें सार। सहजेंचि नर पावती।।४४०।। ऐसा प्राण जयो आलिया हाता। दो प्रकारी भजनावस्था। एकी सगुण आगमोक्ता। दुजी योगाभ्यासता निर्गुणत्वें।।४४१।। परि दोहींचे समाधान। निर्गुणीच पावे जाण। त्या दोहींचे उपलक्षण। संक्षेपे श्रीकृष्ण सांगत। ४४२।। आगा ॐ हें स्मरो सरे। स्मरतां स्वरेसी प्राणू प्रणवी भरे। मग प्रणवूचि तेव्हां स्फुरे। अखंडाकारे उल्हासतु।।४४३।। जेथूनि अक्षरें उपजती। शब्द वदोनि जेथें समावती। मग जें उरें जाण ती स्फूर्ती। प्रणवू निश्चिती त्या नांव।।४४४।। त्या प्रणवाचेनि आधारे। जिणोनिया साही चक्रे। तो प्रणवू सूनि धुरे। निज निर्धारे पालिजे।।४४५।।

—एकनाथी भागवत, अध्याय १४

हिरण्यगर्भो वेदानां मंत्राणां प्रणवस्त्रिवृत। अक्षराणामकारोऽस्मि पदानिच्छन्दसामहम् वेद अध्यापक प्रसिद्ध। हिरण्यगर्भ मी म्हणें गोविंद। माझेनि वाणी अनुलंघ्य वेद। वेद वाद तोही मी।।७१।। ओंकारावीण मंत्रश्रेणी। ते जाण बाळकाची कहाणी। मंत्री ओंकार मी चक्रपाणी। सकळमंत्र त्याचेनि पावन।।७२।। अकार उकार मकार अर्ध मात्रेसी उच्चार। या नाव 'त्रिवृत्त' ओंकार। पावन मंत्र येणेसी।।७३।। अक्षरांच्या उच्चारांसीं। अकार लागला सर्वांसी। तो अकारू मी ऋषिकेशी। जाण निश्चयेसी उद्धवा।।७४।। अक्षरी अकार मी मुकुंदू। छंदामाजी गायत्रि छंदु। ते मी म्हणे गोविंदू। या लागी ब्रह्मवृंदू सेविती।।७५।। सकल द्वंद्वामाजी निर्द्वंद। तो मी म्हणे गोविंद। पूज्य द्विजवृंद येणेचि मज।।

—एकनाथी भागवत, अध्याय १६

मी निजानंद हृदयाआंत। त्या मज उपेक्षूनि भ्रांत। कामासक्ती लोलंगत। द्वारे वोळंगत नीचांची।।२।। त्या हृदयस्थ देवाचें ध्यान। नित्य योग्यासीनिदिध्यासन। सम करोनि प्राणापान। सदा अनुसंदान नादांचे।।३।।